
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र.

# मळा

सदाशिव
अनंत
शुक्ल



REFBK-0014061
REFBK-0014061

चेतक पुस्तक

१६८८ काव्य
२८.१२.६४

# भक्तीचा मळा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४००६२ वि: काव्य
क्रमांक १६८८ नों दि: २८.१२.६४

सदाशिव अनन्त शुक्ल

चेतक पुस्तक

REFBK-0014061
REFBK-0014061

कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २

मूल्य एक रुपया

© स. अ. शुक्ल

पहिली
आवृत्ति
जुलै
१९६५

मुद्रक – बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई

प्रकाशक – बा. ग. ढवळे
कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २

# प्रपंचीं परमार्थ साधावा

दा. क्र. १५४९७

एका जनार्दनीं सांवता तो धन्य ।
तयाचें महिमान न कळे कांहीं ॥

आपलें सांस्कृतिक जीवन ज्या पौराणिक आणि ऐतिहासिक कथांनीं घडविलें आहे, त्या कथा, नाटक, चित्रपट, काव्य, कथा-कादंबरी, इत्यादि ललित साहित्याच्या विविध रूपांनीं वारंवार कथन करून त्यांतील तेजस्वी तत्त्वें विशद करून सांगण्याची आणि लोकोत्तर महापुरुषांच्या उदात्त शिकवणुकीची, उज्ज्वल तत्त्वज्ञानाची ओळख बहुजनसमाजास करून देण्याची नित्य नितान्त आवश्यकता असते. त्यामुळेंच समाजाची संस्कृति, सदभिरुचि अखंड जागृत ठेवण्याचें कार्य साधतें.

आमच्या संतांनीं अध्यात्म आणि व्यवहार ह्यांची अजोड सांगड कशी घालावी, प्रपंचांत राहून परमार्थ कसा साधावा, हेंच शिकविलें आहे. अकारण विरोध, अकल्पित संकटें, अनंत हालअपेष्टा ... हें सगळें स्थितप्रज्ञतेनें सहन करीतच आपला ध्येयमार्ग चोखाळून बहुजनसमाजाच्या अंतिम कल्याणासाठीं समतेचा, ममतेचा संदेश संतांनीं दिलेला आहे.

दैनंदिन व्यवहारांत सर्वसामान्य प्रसंगांना तोंड देत जीवनाची वाटचाल करीत असतांना त्यांचें सर्वांगीण असामान्यत्व प्रकटलेलें आढळतें. साधुसंतांचीं चरित्रें अलौकिक आणि चमत्कृतिपूर्ण असल्यामुळेंच आज शतकानुशतकें बहुजनसमाज त्यांवर लुब्ध झाला आहे.

संतश्रेष्ठ श्रीसांवतामाळी ह्या सत्पुरुषानेंही 'प्रपंचीं असोनी परमार्थ साधावा' अशी तेजस्वी शिकवण मुमुक्षुजनांना दिली. आपलें चरितार्थाचें साधन म्हणजेच देवानें नेमून दिलेलें कर्तव्य! तें नेकीनें, निष्ठेनें, निर्धारानें, निरलसपणें पार पाडण्यानेंच सहजासहजीं ईश्वरप्राप्ति होते ... स्वकर्मसाधन म्हणजेच ईश्वरपूजन! ... ह्याच सत्याचा साक्षात्कार स्वतः अनुभवून ह्या कर्मयोगी महात्म्यानें जगालाही पटविला आणि 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।' हें भगवद्गीतेचें वचन सार्थ करून दाखविलें.

जागतिक कीर्तीचे महान् चित्रपटनिर्माते व दिग्दर्शक श्री. व्ही. शान्ताराम ह्यांच्या 'राजकमल कलामन्दिर'चा मीं लिहिलेला श्रीसांवतामाळी ह्यांच्या जीवनकथेवरील 'भक्तीचा मळा' हा हिन्दी-मराठी भाषेंतील नटवर्य केशवराव दाते-दिग्दर्शित चित्रपट अखिल भारतांत अतिशयच गाजला. त्या चित्रपटांतील संवाद-गीतें प्रस्तुत पुस्तकांत समाविष्ट आहेत.

श्रीसांवतामहाराजांची प्रस्तुत जीवनकथा आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना आवडेल, अशी आशा आहे.

सदाशिव अनन्त शुक्ल

श्रीसमर्थ-सदन, बनाम हॉल लेन, गिरगांव, मुंबई ४

# भक्तीची धाडली वानगी

संत सांवता माळी श्रीक्षेत्र पंढरपूरजवळच्या अरणगांवचा राहाणारा. तेथें गांवालगतच त्याचा एक मळा होता. हरतऱ्हेचा भाजीपाला, फळझाडें, फुलझाडें ह्यांनीं तो बाराही महिने बहरलेला असायचा. भगवंताच्या भक्तीनें ओथंबलेलीं भजनें गात गात सांवता विहिरीवर मोट हांकायचा. त्याची घरधनीण जनाई आणि एकुलती एक चुणचुणीत चिमुरडी पोर नागू ... दोघीही त्याच्या बरोबरीनें शेतमळ्याच्या मशागतींत अहोरात्र आनंदानें गढलेल्या असायच्या.

आमुची माळियाची जात
शेत लावूं बागाईत
आम्हां हातीं मोट-नाडा
पाणी जातें फुलझाडां
शान्ति-शेवन्ती फुलली
प्रेम जाई-जुई व्याली
सांवत्यानें केला मळा
विठ्ठल देखियला डोळां !

आजही नेहमींप्रमाणें सूर्योदयाच्या सुमारास सांवता आपल्या शेतमळ्यांतल्या विहिरीवर मोट हांकीत तोंडानें वरील अभंग म्हणत होता.

फळझाडांना आणि फुलांच्या ताटव्यांना पाणी पाजण्यांत गुंतलेल्या जनाई नि नागू सांवताच्या अभंगाला साथ देत होत्या. जराशानें नागू ओरडली, "बाबाऽऽ ! मोट सोडा हो !...सपलं शिपनं !"

सांवतानें मोट सोडून बैल चरायला पिटाळले आणि 'सांवत्यानें केला मळा । विठ्ठल देखियला डोळां ॥' असें गुणगुणत तो नागूजवळ येऊं लागला, तोंच "तुझं बेश हाय, बाबा! तुला इथंच दिसतोय् विठ्ठल !" असें म्हणत शिवबा आला.

शिवबाचे आई-वडील पंढरीची पायीं वारी नेमानें करणारे होते. पण यंदा त्याची आई नुकतीच दुखण्यांतून उठली होती आणि वृद्ध वडीलही थकल्यामुळें त्यांना पायीं वारी निभणें शक्य नव्हतें. म्हणून शिवबा बैलगाडीच्या खटपटीला लागला. त्याला गाडी मिळाली, पण सगळ्यांचीं शेतीचीं कामें चालू असल्यामुळें बैल मात्र कोणीच देईना. म्हणून बैल मागायला तो सांवताकडे आला. सांवतानें त्याला आपली जय-विजय ही बैलांची जोडी आनंदानें दिली. बैल घेऊन शिवबा गेल्यावर जनाई म्हणाली, "अवो, बैल दिलंसा, पर आतां औताची जुपनी कशी व्हनार ? ... सोतां कंदी पंढरीला जायचं न्हाई ... "

"म्हणूनच म्हटलं, निदान आपल्या बैलांना तरी पंढरीची यात्रा नि चंद्रभागेचं स्नान घडूं दे !" असें म्हणून सांवता हसूं लागला.

"काय हसून ग्वाड करतायसा ! तुमचं वागनंच आपलं जगायेगळं. सा कोसांवर पंढरी, पर आजपातुर एकदाबी दरसन घेतलं न्हाई इट्टलाचं !"

जनाईच्या ह्या बोलण्यावर लगेच मळ्याकडे हात करून सांवता म्हणाला, "अग, ही सारी पांडुरंगाच्याच कृपेची पंढरी पिकली आहे कीं ! आपला पांडुरंग ... आपलं पंढरपूर, इथें ह्या मळ्यांतच आहे ! ... माणसानें

आपला धंदा-रोजगार सोडून पंढरीच्या वाऱ्या करण्यांत काय शहाणपणा आहे ?”

“पर चार दीस इश्रांति म्हून तरी ....”

“विश्रांति !...आवडीचें काम करी । तीच विश्रांति साजरी ॥ स्वकर्मांत व्हावें रत । मोक्ष मिळे हातोहात ॥”

“पुरे तुमचा येदांत !”

तितक्यांत दिंडीचें भजन ऐकूं येऊं लागलें. “पालखी निघाली जनुं. . .” असें म्हणून नागूनें भराभर पुष्कळ फुलें तोडलीं आणि फुलाजीराव सावकाराच्या वाड्याकडे धूम ठोकली.

फुलाजीरावाच्या वाड्यापुढील प्रशस्त अंगणांत वारीबरोबर जाणारी देवाची पालखी होती. वारकऱ्यांचें भजन चालू होतें. देवाला फुलें वाहाण्यासाठीं नागू थेट पालखीकडे जाऊं लागली, तोंच कांहीं टवाळ वारकऱ्यांनीं तिला अडविलें आणि “ आम्हीं घेतलीं म्हणजे पोंचलीं पांडुरंगाला. ” असें म्हणून तिच्या ओंच्यांतलीं सगळीं फुलें घाईघाईनें काढून घेतलीं. बिचारी नागू हिरमुसली. उरल्यासुरल्या फुलांच्या पाकळ्या दुरूनच पालखीवर उधळून तिनें नमस्कार केला.

इकडे अंगणांत सारे वारकरी गजरा सावकारिणीची वाट बघत ताटकळत बसले होते, तर तिकडे गोपाळदादा नांवाच्या एका तरुणाबरोबर हास्यविनोद, गप्पागोष्टी करीत गजरा आपल्या खोलींत मोठ्या आरशासमोर बसून साजशिणगारांत गुंतली होती.

पलीकडल्या खोलींत तिचा नवरा फुलाजीराव सावकार तापानें फणफणून अंथरुणावर कण्हत कुंथत पडला होता. मधून मधून गजराला मोठ्यांदा हांका मारीत होता. अखेर सगळा शिणगार आटोपल्यावर “ काय झालं एवढं घर डोक्यावर घ्यायला ? ” असें म्हणत तावातावानें गजरा तेथें आली. तिला पाहातांच फुलाजीराव गरजला, “ इकडे नवऱ्याचा

जीव चाललाय् नि तुला पंढरीची वारी सुचत्येय्! ... मी असा अंथरुणाला खिळलोंय्..."

"काय धाड झालीय् तुम्हांला?...सगळं ढोंग!" असें म्हणून आपल्या नोकराला – काशीबाला – तिनें फर्मावलें, "काशीबा! हे माझे कपडे भर पडशींत...ह्या पाण्याच्या तांब्याला दोरी लाव...अन् माझी तंबोरी, टाळ, चिपळ्या...सारं इकडे घेऊन ये."

"दे–दे तिला तंबोरी, चिपळ्या, टाळ, माळ! ..आतां तेवढे चाळ पायांत बांध नि जा नाचायला त्या ताफ्यांत!"

पण फुलाजीरावाच्या ह्या ओरडण्याकडे लक्ष न देतां गजरानें आपली सारी तयारी केली. काशीबाकडून चहूंकडे कड्या-कुलुपें लावून किल्ल्यांचा जुडगा कनवटीला खोचला आणि "सारं नीट सांभाळ. पोपटाचा पिंजरा रोज साफ करीत जा." असें काशीबाला बजावीत पुन्हा एकदा आपला जामानिमा आरशांत न्याहाळून 'पांडुरंग... पांडुरंग!' असें म्हणत शांत मुद्रेनें ती बाहेर पडली.

गजराताईला पाहातांच सर्व वारकऱ्यांनीं 'पुंडलीक वरदा हाऽऽरी विठ्ठल!' असा प्रचंड गजर करून भजनाला प्रारंभ केला. पालखीला नमस्कार करून गजरा दिंडींत मिसळली. एक वृद्ध वारकरी म्हणाला, "आतां आधीं गजराताईनीं आपल्या गोड गळ्यानें एखादं फक्कडसं भजन म्हटलं पाहिजे. त्याखेरीज पालखी हलणार नाहीं." गजरानें मग जरा आढेवेढे घेऊन पुढील भजन म्हटलें:

कुणीतरी सांगा हो सांगा!
माझा जिवलग मिळेल कोठें?
प्रभु तो मिळेल कोठें?
कुणीतरी सांगा हो सांगा!

शांतिसुखाचा अवघा ठेवा
सखा प्रीतिचा प्राणविसांवा
जगीं कधीं आढळेल कोठें ?
प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा !

पळभर नाहीं चैन जिवासी
भरल्या संसारीं वनवासी
जीवन वाटे शून्यच खोटें !
जिवलग मिळेल कोठें ?
प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा !

चार दिसांची इथली वसती
मिसळणार मातींतच माती !
पडे जिवाला कोडें मोठें
जिवलग मिळेल कोठें ?
माझा प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा !

गजराचें गाणें संपेपर्यंत तिचें सामानसुमान काशीबानें तट्टावर व्यवस्थितपणें लादलें आणि तो वाड्यांत परत आला. फुलाजीरावाची औषधाची वेळ झाली होती, म्हणून तो त्याला पेल्यांतून औषध देऊं लागला. "धनी ! औषध ..."

"फेकून दे तिकडे !" फुलाजीरावानें औषधाचा पेला हातानें उडवून दिला आणि "शेवटीं गलीच ही सटवी ! वैरीण ! कैदाशीण !" अशी संतापवायु झाल्याप्रमाणें बडबड आरंभून अंगावरचे कपडे टराटरा फाडायला सुरुवात केली. काशीबा घाबरला. पळत पळत बाहेर

सोप्यावर येऊन गजराला, गोपाळदादाला हाका मारूं लागला. पण भजनांत दंग होऊन सर्वांचीच ब्रह्मानंदीं टाळी लागली होती. तेवढ्यांत त्याला नागू दिसली. तिला जवळ बोलावून तो म्हणाला, "नागू! नागू! अशीच परसदारानें, मधल्या वाटेनें पळ नि सांवताबाबांना इकडे धाडून दे. म्हणावं, असाल तसे या ..." नागू धावत गेली.

दरम्यान फुलाजीराव "कुठें गेली ती ढोंगी ढालगज भवानी? हडळ!" असें ओरडत धडपडत माजघरापर्यंत आला. काशीबा अडवूं लागतांच त्याला बाजूला लोटून तो बाहेर सोप्यावर येऊं लागला. पण एकदम तोल जाऊन खांबावर आदळला आणि झीट येऊन पडला. त्याच्या डोक्याला दांडगी खोक पडून तींतून रक्त भळभळूं लागलें. काशीबा घाबऱ्या घाबऱ्या ओरडला, "बाईसाब! बाईसाब! धन्यास्नी झीट आलीया!"

"मग मी काय करूं? झीट आली तर फोड कांदा नि दे हुंगायला!" गजरा अंगणांतूनच कडाडली.

"धन्यांच्या डोचक्यालाबी खोक पडलिया!" काशीबा पुन्हा ओरडला. त्यावर "अरे,पण खोक पडायला बिछाना सोडून कुठें गेले होते कडमडायला?" असें म्हणून गजरानें काशीबाला फर्मांविलें, "हे बघ काशीबा! आधीं चार कांदे माझ्या पडशींत घाल... वाटेंत कुणाला झीटबीट आली, तर आपले असावेत!"

काशीबानें झटपट कांदा फोडून फुलाजीरावाच्या नाकाशीं धरला. तितक्यांत सांवता आला. त्या दोघांनीं मिळून त्याला उचललें आणि नीट बिछान्यावर नेऊन निजविलें. त्याच वेळीं बाहेर अंगणांत 'पुंडलीक वरदा हाऽऽरी विठ्ठल!' असा घोष करीत वारकऱ्यांनीं पालखी उचलली!

फुलाजीरावाच्या डोक्यावरल्या जखमेचें रक्त ओल्या फडक्यानें पुसून काढून सांवतानें पट्टी बांधली. मग बाहेर येऊन तो गजराला म्हणाला,

"गजराताई! फुलाजीराव आजारी नि तुम्ही वारीला निघालांत?"

४००६२ दि: ०१।०५ नों दि: २८।१२।५६

"आमच्या घरच्या पंचायत्या तुला नकोत."

"तें खरं. पण प्राप्तकर्तव्य सोडून माणसानें देवाकडे धावणं म्हणजे देवाघरीं गुन्हा करणं आहे ... शिवाय, पति हाच स्त्रियांचा पांडुरंग! परमेश्वर!"

"बरं–बरं. पुरे तुझा शहाणपणा! म्हणे वारीला जाऊं नका!"

"नि तेंही गजराताईंना सांगतोय्! काय बाई धारिष्ट तरी!" डोक्यावर तुळशीची कुंडी घेतलेली एक वारकरीण उद्गारली. आणि मग सर्वांनींच सांवतावर तोंड सोडलें.

रावजीशास्त्री बोलले, "हें कलियुग बरं, कलियुग! अशीं पाखंडी नतद्रष्ट माणसं भेटणारच नि पंढरीला जाऊं नका म्हणणारच!"

"अहो, ह्या सांवत्याला आपण आज का ओळखतोंय्?" गोपाळदादा म्हणाला, "पक्का ढोंगी नि दांभिक माणूस हा! एकीकडे तोंडानें 'विठ्ठल-विठ्ठल' करीत साधुपणा मिरवायचा नि सगळा जीव शेतमळ्यांत गुंतवून ठेवायचा! अवघ्या सहा कोसांवर राहून उभ्या आयुष्यांत एकदा तरी कधीं चुकून हा पंढरपूरला गेलाय् का? उलट आम्हांलाच 'जाऊं नका' म्हणून थोर तोंडानें सांगतोय्!"

"पंढरीला न जाणारा हा तेवढा शहाणा, खरा विठ्ठलभक्त! नि पायीं वारी करणारे आम्ही सारे भाविक वारकरी वेडे, खोटे विठ्ठलभक्त! चांगला न्याय आहे बाई!" गजराच्या ह्या बोलण्यावर वारकरी मंडळींत हास्यकल्लोळ उडाला. सांवता हात जोडून नम्रपणें म्हणाला,

"तुम्ही वारकरी थोर, ज्ञानी, पुण्यवंत! मी काय बरं बोलणार तुमच्यापुढें? पण मला वाटतं, पांडुरंगाचं दर्शन घ्यायला पंढरपूरलाच गेलं पाहिजे असं नाहीं. जिव्हाळ्याचा भक्तिरंग। तिथें उभा पांडुरंग॥"

ह्यावर सर्वांनींच सांवताची हसून हेटाळणी चालविली. अखेर, "पुरे झाला ह्या मूर्खांशीं वितंडवाद! चला, चालूं लागूं या." असें

गोपाळदादानें म्हणतांच 'पुंडलीक वरदा हाऽऽरी विठ्ठल' च्या गजरांत वारकरी पुढील अभंग म्हणत म्हणत पालखीबरोबर चालूं लागले :

जाऊं चला पंढरीला। पाहूं पांडुरंग डोळां
खोटा संसार-पसारा। खेळ मायेचा हा सारा
नको प्रपंचाची हाव। घ्या हो देवापायीं धांव

पंढरीची वाट धरलेल्या वारकऱ्यांचें हें भजन तिकडे जोरांत चाललें होतें आणि इकडे मळ्याकडे परत चाललेला सांवता गुणगुणत होता :

कां हो धुंडितां देऊळीं?। देव हृदयाच्या राऊळीं
नाचे विश्वाचा पसारा। मंगल विठ्ठलमय सारा
करा प्रपंच नेटका। लुटा परमार्थाच्या सुखा

दर सालच्या रिवाजाप्रमाणें वारकऱ्यांची पालखी गांवाच्या वेशीवर थांबली आणि गजरानें 'गौळण' म्हटली :

हरि वाजवि मंजुळ मुरली
बाई! मुरलीनें तहानभूक हरली!
कामकाज हातचें टाकुनी
गोकुळ अवघें नाचत हरखुनी
मुरलीच कानिंमनीं भरली,
हरि वाजवि मंजुळ मुरली!
तान्हुल्यासि पाजित कुणी गौळण
मुरलीनें बावरली ती पण
तिला मुलाची शुद्धच नुरली,
हरि वाजवि मंजुळ मुरली!
राधा तर बघ, वेडी झाली
सोडुनि पतिची शेज चालली
जनामनाची लज्जा सरली;
हरि वाजवि मंजुळ मुरली!

सर्वांनीं ' वाहवा ! वाहवा ! ' अशी गजराच्या गौळणीची मुक्तकंठानें तारीफ केली आणि मग ' पुंडलीक वरदा हाऽऽरी विठ्ठल ' च्या गजरांत पालखी उचलून वारकऱ्यांनीं भजन म्हणत पंढरीची वाट धरली.

सांवता मळ्यांत येऊन पाहातो, तों सारे कामकरी, मजूर स्त्रीपुरुष वारीला निघालेले. सांवताला नवल वाटलें. तो म्हणाला, " हातचा कामधंदा टाकून वारीला निघालांत ? ज्यांच्या मागें प्रपंचाचा व्याप नाहीं, त्यांनीं खुशाल ' देव-देव ' करीत हिंडावं. पण तुमच्या-आमच्यासारख्यांनीं देवाकडे धावणं त्या देवालाही पसंत पडणार नाहीं. "

पण सांवताचें हें सांगणें कोणालाच पटलें नाहीं. सारेजण वारीबरोबर पंढरपूरला चालूं लागले.

सांवताच्या मळ्यावरूनच पंढरपूरची वाट गेलेली होती. त्या वाटेनें वारी चाललेली पाहून सांवताच्या लाडक्या नागूनेंही वारीला जाण्याचा हट्ट धरला. तेव्हां सांवता तिला म्हणाला, " अग नागू, देव पंढरपुरांतच आहे नि इथें नाहीं, असं थोडंच आहे ? देव सर्वत्र आहे. तो परमेश्वर अणुरेणु व्यापून उरला आहे." त्यावर नागूनें विचारलें, " देव चहुंकडे हाय म्हनतां, मग त्यो दिसत कसा न्हाई ? "

सांवतानें चटकन् जवळच्या एका वेलीवरलें एक सुवासिक फूल तोडलें आणि तें नागूला देऊन म्हटलें, " ह्या फुलाचा वास तुला येतोय् ना ? "

" होऽऽ ! न यायला काय झालं ? " फूल हुंगीत नागू म्हणाली.

" दाखव बघूं तो वास ! "

" दाखवायचा कसा ? वास आहे एवढं खरं. " नागू म्हणाली.

" म्हणजे वास आहे, हें तुला पटतंय्. पण तो वास तुला दाखवतां येत नाहीं ... तुझ्या डोळ्यांना दिसत नाहीं. खरं ना ? तसंच देवाचं आहे. देव आहे, पण तो दिसत नाहीं ... प्रत्यक्ष दाखवतां येत नाहीं. "

" असं कसं व्हईल ? देव आहे, तर त्यो परत्यक्ष दिसायलाच हवा. "

नागूच्या बालमनाची समजूत कशी घालावी, तें सांवताला कळेना. जरा विचार करून तो म्हणाला, “ अग वेडे, पंढरपूरचा विठ्ठल म्हणजेच ह्या आपल्या मळ्याचा धनी ! त्या धन्याला न विचारतां जर आपण वारीबरोबर तिकडे गेलों, तर तो मळ्याचा धनी आपल्यावर रागावणार नाहीं का ? ”

ह्या युक्तिवादानें मात्र नागूची समजूत पटलेली दिसली. तिनें तडक मळ्यांत धाव घेतली आणि टोपलीभर फळें तोडून आणलें. तितक्यांत बैलगाडी घेऊन शिवबा आला. गाडींत बसलेला शिवबाचा बाप म्हणाला, “ सांवताबा ! ह्या वारीचं समदं पुन्य तुलाच हाय रे बाबा ! तूं बैलं दिलीस, म्हून आवंदा वारी घडली. ”

नागूच्या हातांतल्या फळांच्या टोपलीकडे लक्ष जातांच शिवबाची आई गिरिजा म्हणाली, “ पोरी, कशाला आनलंस हें समदं ? ”

“ तुमास्नी नव्हं ! पंढरपूच्या आमच्या मळयाच्या धन्याला ह्यें द्यायचं हाय ! ”

“ तुमच्या मळयाचा धनी ? कोन ग ? ”

“ तुमास्नी ठावं न्हाई ?... इट्टल म्हंत्यात त्येला...बाबांनींच आत्तां सांगितलं...त्येला ह्यें समदं द्या ... इसरूं नगा हं !... अन् धन्यास्नी माजा दंडवत सांगून एक सांगावा बी सांगा त्येला ... ”

“ तुझा सांगावा ? तो ग कोणता ? ” सांवतानें कौतुकानें विचारलें.

“ त्येला म्हनावं, एकदा आपल्या मळयाकडे येऊनशान जा बिगिबिगी. ...हतंच शेताच्या बांधाला वाट बगतीया तुजी ... सांवताची पोरगी ! ... इसरूं नगा हं माजा सांगावा, गिरजाकाकी ! ”

“ न्हाई इसरनार ! जरूर सांगनार इट्टलाला ! येतों हं सांवताबा ! ” असें म्हणून शिवबानें गाडी हाकली.

आणि मग तोच सांगावा आनंदाच्या भरांत सुरावर गात नागू नाचूं लागली :

येऊन जा बिगिबिगी !
हतंच शेताच्या बांधाला
वाट बगतीया तुजी इट्ठला !
सांवताची पोरगी,
येऊन जा बिगिबिगी !
शेंगा, वांगीं, कणसं कवळीं
संत्रं, केळीं, पेरू, रताळीं
भक्तीची धाडली वानगी.
येऊन जा बिगिबिगी !
तूं धनी आमुचा, आमी तुजे चाकुर
पर न्हाई भेटलों कवाच आजपातुर
तुला मळ्यांत आनल्याबिगर आतामातुर
आमी न्हाई न्हानार उगी
येऊन जा बिगिबिगी !

# सांवतानें म्हसोबा हलविला

प्रपंचीं असोनी परमार्थ साधावा । वाचें आठवावा पांडुरंग ॥ हें भजन आळवीत सांवता शेत नांगरीत होता. मध्येंच त्याचा नांगर शेंदूर लावलेल्या एका दांडग्या दगडाला अडला. सांवता तो दगड हलवून काढूं लागला. पण त्याला एकट्याला तें जमेना. तितक्यांत गांवाकडे सावकाराच्या गवताची गाडी घेऊन चाललेले जानबा व अन्याबा त्याला सहज दिसले. त्यानें त्यांना हाक मारली. पण त्या दगडाला हात लावायला ते तयार होईनात. जानबा म्हणाला, "अवो सांवताबा, ह्यो तर तुमच्या शेतमळ्यांतला म्हसोबा !"

"होय रे ! म्हणूनच ह्याला उचलून पलीकडे नीट बांधावर ठेवावा म्हणतों. बिचारा मातीखालीं दडपला गेलाय्...जरा हात लावा..."

"आमी नाय बा ! अन् तुमीबी नगा हलवूं ह्येला. देवाची अडगळ झालीया जनुं तुमास्नी !" अन्याबा बोलला, "तुमचं तुमी कायबी करा."

जानबा-अन्याबा निघून गेले. मग सांवतानें एकट्यानेंच त्या म्हसोबाला कसेंबसें उचलून एका उंबराच्या झाडाखालीं बांधावर ठेवलें आणि त्याला

जवळच्या फुलझाडांवरचीं फुलें वाहून भक्तिभावानें हात जोडले.

तितक्यांत फुलाजीराव सावकार पुढें नि काशीबा मागें, असे दोघे धावत येतांना सांवताला दिसले. काशीबा ओरडत होता, "धनी ! धनी ! थांबा !... थांबा !... सांवताबा ! अडवा त्यांना !"

सांवतानें फुलाजीरावाला धरलें. धावून दमल्यामुळें त्यानें एकदम बसकण मारली.

" सावकार, तुम्ही आजारी नि असे धावतांय् कुठें ?" सांवताच्या ह्या प्रश्नाला फुलाजीरावानें फक्त पाणावलेल्या केविलवाण्या नजरेनेंच उत्तर दिलें. तेवढयांत काशीबा धावत येऊन धापा टाकीत म्हणाला,

" सांवताबा, धनी जीव द्यायला निघालेत हो ! "

" ती हडळ छळून छळून माझा जीव घेत्येय् ... जीवच द्यायला चाललोंय् मी." फुलाजीराव दांतओठ खात वैतागानें बोलला.

" सावकार, वाड्यांत परत जा. ऐका माझं. "

" पण सांवता, तो वाडा नव्हे ... कोंडवाडा आहे. मला ... प्रत्यक्ष आपल्या आजारी नवऱ्याला कोंडून ठेवून ती डाकीण पंढरपूरला पुण्य जोडायला गेलीय् रे ! त्या कैदखान्यांत ... त्या घरांत मी पुन्हा पाऊल टाकणार नाहीं. "

" मग असं करा, तूर्त तुम्ही माझ्या घरीं चला. नाहीं तरी माझ्या गरिबाच्या झोपडीला तुमचे पाय कधीं लागणार ? "

सांवता फुलाजीरावाला घेऊन आपल्या घरीं आला.

सांवताच्या मळयांत आल्यावर फुलाजीरावाला नंदनवनांत आल्यासारखें वाटलें. त्याचें मन शांत, प्रसन्न झालें. जनाईनें त्याला अगत्यानें, आग्रहानें फराळाचें खाऊं घातलें. नागूनें आपली फुलांनीं डंवरलेली फुलबाग त्याला हिंडून दाखविली. त्याला वासाचीं खूप फुलें तोडून दिलीं.

तिचं तोंड भरून कौतुक करीत फुलाजीराव हसत हसत म्हणाला, " नागूताई, छान आहे हं तुमची बाग ! "

त्यावर लगेच नागू गंभीरपणें बोलली, " आमची नव्ह ही बाग ! बाबा म्हंत्यात, पंढरपूरला कुनी इट्टल म्हून ऱ्हातुया ... त्यो हाय ह्या बागमळयाचा धनी ! तुमास्नी ठावा हाय काय हो त्यो इट्टल ? "

" वा ! वा ! पंढरपूरचा विठ्ठल कुणाला ठाऊक नाहीं ? साऱ्या जगाला ठाऊक आहे. "

" त्यो कसा हाय वो ? "

" अग, तुझ्या-माझ्यासारखा नाहीं तो. त्याला चार हात आहेत ! "

" चार हात ? अग बया ! "

" आणि त्याला किनई तुळस, फुलं नि तुझ्यासारखीं गोड, गुणी, गोजिरीं मुलं फार फार आवडतात बघ. " असें म्हणून फुलाजीराव हसूं लागला. नागूलाही आनंदाचें, अभिमानाचें भरतें आलें. एकंदरींत, सांवताच्या मळयाच्या रम्य, प्रसन्न वातावरणांत आणि नागूच्या गोड सहवासांत फुलाजीरावाचा जीव रमून गेला.

सांवतानें आपल्या शेतांतला म्हसोबा लविला, ही गोष्ट जानबा-अन्याबांनीं गांवांत जातांक्षणींच पाटलाला सांगितली. मग लगेच ती वार्ता वाऱ्यासारखी पसरून बायकांमुलांच्याही तोंडीं झाली. घरींदारीं, बाजारपेठेंत, पाणवठ्यावर तीच एक गोष्ट जो तो बोलूं लागला. चावडीवरही तीच चर्चा चालली होती.

पाटील म्हणजे गांवचा राजा. त्याचाच शब्द प्रत्येकानें झेलला पाहिजे. पण अरणगांवांत सारेजण सांवताला मान, मोठेपणा देत. त्याचा शब्द मानीत. त्यामुळें पाटलाला मनांतून मोठें वैषम्य वाटत होतें. शिवाय, सांवताच्या सुखी, स्वावलंबी जीवनाचा हेवा करणारीं दुसरींही दुष्ट, विघ्नसंतोषी माणसें गांवांत होतींच. सांवताविषयीं मनांत अढी धरून

त्याला सतावून सोडायची, कमीपणा आणायची संधि ते लोक पाहातच होते. त्यांना आतां फावलें. त्यांनीं आणि पाटलानें मिळून सांवताविरुद्ध गांवकऱ्यांना आणि ठाणेदाराला चिथावण्याचा चंग बांधला. म्हणूनच सांवतानें आपल्या शेतांतला म्हसोबा हलविला, ह्या गोष्टीचा बाऊ–बभ्रा करून चावडीवरल्या चर्चेंत पाटलानें पुढाकार घेतला.

" लई वंगाळ काम केलं सांवत्यानं ... दांडगी छाती मर्दाची. " एक म्हातारा उद्गारला. त्यावर लगेच पाटील बोलला,

" छाती कसली ? देव-धरम मानतुया कधीं कुटं सांवत्या ? "

" पण पाटील, सांवतानें आपल्या मळ्यांतला म्हसोबा हलवला नि तुम्ही कां उगीच शिरा ताणतांय् ? तो त्याचा खासगी प्रश्न आहे. "

ठाणेदाराच्या ह्या बोलण्यावर पाटील म्हणाला, " असं कसं म्हंता, ठानेदार ? अवो, त्यो म्हसोबा कोपला, तर समद्या गांवावर अरिष्ट कोसळंल ना ? "

" हां ! हां ! बराबर हाय ! " सर्वांनीं पाटलाला दुजोरा दिला. तितक्यांत रस्त्यानें भाजी विकायला चाललेला सांवता दिसतांच पाटील ठाणेदाराला म्हणाला, " ठानदार ! त्यो बगा, सांवत्या चाललाय् ... इचारा त्येला जाब. "

" राहूं द्या हो पाटील ! नसत्या पंचायत्या तुम्हांला कशाला ? " असें म्हणून ठाणेदार निघूनं गेला. त्या वेळीं मग कोणालाच, खुद्द पाटलालाही हिंमत झाली नाहीं म्हसोबासंबंधीं सांवताला विचारायची. तरी पण मनांत जळफळत, मिशीला पीळ भरीत पाटील गरजला, " बग्गूं ... बग्गूं ! ... म्यांच इंगा दावीन सांवत्याला. जातोय् कुटं त्यो ? ... गवसल माज्या तडाक्यांत ... येईलच मोका ... बग्गूं ... बग्गूं ! "

आणि तसा मोका अनायासें चालून आलाही.

# वडाची साल पिंपळाला

पंढरपूरला गेलेली वारी परतली. कर्मधर्मसंयोगानें वारीबरोबरच महामारीची सांथही आली. गोपाळदादा वाख्यानें आजारी पडला म्हणून गजरानें त्याला बैलगाडींतून आणलें. गाडी सावकाराच्या वाड्यासमोर उभी राहिली. ' पांडुरंग...पांडुरंग ' म्हणत गाडींतून उतरतांच गजराचें लक्ष प्रथम पोपटाच्या पिंजऱ्याकडे गेलें. पिंजरा रिकामा होता ! गजरा आश्चर्यानें उद्गारली, " हें काय ? माझा पोपट कुठें आहे ? "

" उडून गेला ! सावकार सांवताच्या मळयावर ऱ्हायला गेलं, तवांच पोपटबी पिंजऱ्यांतन उडून गेला ! " शेजारच्या एका म्हाताऱ्यानें मिस्किलपणें हसत हसत सांगितलें.

" हे सांवताच्या मळ्यांत राहायला गेले ? ... नि काशीबा कुठें उलथला ? "

" जकडं धनी, तकडं त्येचा इमानी चाकर ! "

गजराच्या अंगाची लाही लाही झाली. तिनें गोपाळदादाला हाताला धरून हळूहळू वाड्यांत नेलें आणि फुलाजीरावाच्या बिछान्यावर निजविलें.

जनाका ४००६२ दि: ...११/६४... क्रमांक ...९८८८... नों दि: २८.१२.६४

" पडा स्वस्थ ... ही मी आलेंच ... " असें गोपाळदादाला म्हणत ती त्याच पावलीं परतून गाडींत बसली आणि रागानें फणफणत, तणतणत सांवताच्या मळ्याकडे गेली.

फुलाजीराव 'नको-नको' म्हणत असतांना जनाईनें त्याला आग्रहानें धारोष्ण दूध प्यायला दिलें. तो दुधाचें भांडें तोंडाला लावणार तोंच, " धनी ! धनी ! बाईसाब आल्या ! " असें ओरडत काशीबा धावत आला. फुलाजीराव घाबरला. त्याच्या हातून दुधाचें भांडें गळून पडलें. कोठें तरी लपून बसावें म्हणून तो इकडे तिकडे धावपळ करूं लागला. तितक्यांत तेथें गजरा येऊन कडाडली, " लाज नाहीं वाटली इथें दुसऱ्याच्या दारीं येऊन पडायला ? एवढे मोठे मातबर सावकार तुम्ही गांवांतले ! नि सांवत्यासारख्या एका कंगाल कुणबटाच्या झोपडींत येऊन राहाण्याची अवदसा तुम्हाला कां आठवली ? चला मुकाट्यानें घरीं."

" मी येणार नाहीं ... हें नंदनवन सोडून पुन्हा त्या नरकांत कोण उडी घेईल ? "

" अस्सं ! तो नरक नि हें नंदनवन काय ? ह्या सांवत्यानें कांहींतरी चेटूक केलेलं दिसतंयू तुमच्यावर. "

" तूंच चेटकीण, हडळ आहेस. इतके दिवस आपल्या टाचाखालचें मांजर मला करून ठेवलंस. देवाधर्माचे ढोंग-धत्तुरे माजवणारी निर्लज्ज वेसवा तूं ! "

" चूप ! तोंड मिटा आधीं. "

" आतां माझं तोंड मिटणार नाहीं ... तुमीं कृष्णकृत्यं मी साऱ्या जगाला ओरडून सांगणार ! "

" फुलाजीराव, तुम्ही उगीच त्रास करून घेऊं नका आपल्या जिवाला. घरीं जा ... " सांवता मग गजराकडे वळून म्हणाला, " गजराताई, तुम्ही

दा. क्र. २४०९

आलांत. आमचा घोर मिटला. सांभाळा आतां आपल्या यजमानांना. नुकतेच ते आजारांतून उठलेत... उगीच त्रागा मांडून भांडूंतंडूं नका."

" पुरे कर तुझा मानभावीपणा ! तुझीच फूस आहे ह्यांना. नाहींतर ह्यांची काय छाती होती घराचा उंबरठा ओलांडायची नि माझ्यासमोर असं तोंड उघडायची ! "

" तोंड सांभाळ, चांडाळणी ! ह्या देवमाणसावर तोंड सोडतेस ? कुठें फेडशील हें पाप ? "

" घरीं चला म्हणजे सांगतें तुम्हांला. " असें म्हणत दंडाला धरून गजरानें फुलाजीरावाला फरफटत ओढून नेलें. जनाई बघतच राहिली.

" बया ! बया ! ही सावकारीण अशी कां करतीया भुतानं झपाटल्यावानी ! सारं घर डोक्शीवर घेतलं सटवीनं. "

" स्वभावाला औषध नाहीं. " असें म्हणत आपला औषधांचा झोळणा घेऊन सांवता घराबाहेर पडला. तोंडानें देवाचें भजन म्हणत सांवता डोंगरकपारींतल्या औषधी वनस्पति तोडूं लागला :

दयाळू धन्वन्तरी श्रीहरी !
तूंच एकला जगान्तरीं
सृष्टि निरन्तर तुझ्या कृपेची
साक्ष पटवि अन्तरीं !
राम-रावण-संगरकालीं
लक्ष्मणाला शक्ति लागली
राघवसेवक हनुमन्तानें
उड्डाण करुनी मनोगतीनें
करतलिं झेलित औषधींचा
आणिला द्रोणागिरी !
प्रभुसेवेची ती सोन्याची
सन्धि साधिली खरी !

वारकऱ्यांनीं आणलेली महामारीची सांथ हां हां म्हणतां गांवांत पसरली. तिन्ही त्रिकाळ घरोघर हिंडून सांवता सगळया आजाऱ्यांना औषध देऊं लागला. त्यांची सेवा–शुश्रूषा करूं लागला. इकडे साऱ्या गांवांत एकटा सांवता आजाऱ्यांसाठीं झाडपाल्यांचा औषधी इलाज करीत असतांनाच तिकडे गांवकरी मात्र पटकीसाठीं दैवी उपाय करण्यांत गढून गेले.

मरीआईच्या देवळापुढें ढोल-ताशे वाजूं लागले. देवीची पूजा-आरती करून तिला नवस बोलण्यासाठीं सारा गांव गोळा झाला. गुरवानें सर्वांना भंडारा लावला. कडकलक्ष्मी आपल्या उघड्या अंगावर कोरड्याचे फटके फडाफड मारून घेऊं लागली.

" बोला, बोला जैजैकार ! ... विश्वमावलीचा अवतार ! ... मरीआईचा दरबार ! ... बोला, बोला जैजैकार ! चांगभला ! मरीआईचा चांगभला ! " सर्वांनीं जयघोष केला आणि मग तत्काळ कडकलक्ष्मी घुमूं लागली ... बोलूं लागली ...

" गांवांत अनाचार घडला ... सांवत्यानें म्हसोबा हलवला ... माझा राग भडकला ! "

लगेच गुरवानें पाटलाला म्हटलें, " पाटील ! पाटील ! असं म्होरं या ! गांवाच्या वतीनं देवीला नवस बोला ! " जानबा-अन्याबांनीं गुरवाला साथ दिली आणि मग पाटील पुढें होऊन हात जोडून बोलला,

" आई ! मरीआई ! रुसूं नग ... कोपूं नग ! लेकरांचा सांभाळ कर ! गांवावरलं अरिष्ट दूर कर ! तुला रक्ताचा मळवट भरूं ! ... बकऱ्यांचा निवद करूं ! घरटीं एकेक बकरं देऊं ... तुजा दुवा घेऊं ! चांगभला ! चांगभला ! "

पुन्हा सर्वांनीं गजर केला. शिंग वाजलें. ढोल-ताशे दणाणले.

मरीआईला नवस बोलल्यावर ती हकीकत सांगायला जानबा-अन्याबा गजराकडे आले. गोपाळदादा तेथें होताच. जानबा म्हणाला, "सांवत्यानें म्हसोबा हलवला म्हणूनच गांवांत पटकी भडकली, हें आतां उघडच झालं. कारण..."

"मरीआई तसं स्पष्टच बोलली." अन्याबा म्हणाला. तेवढ्यांत तेथें फुलाजीराव आला. तो म्हणाला, "पण गांवांतल्या पटकीचा नि सांवताच्या शेतांतल्या म्हसोबाचा संबंधच काय? ... पटकी आणशी ह्या म्हसोबांनीं ... ह्या गोप्यासारख्या टाळकुट्या वारकऱ्यांनीं! वडाची साल पिंपळाला चिकटवून त्या बिचाऱ्या सांवताला निष्कारण सतावायला तुम्हांला शरम नाहीं वाटत?"

"तुम्ही गप्प बसा. साक्षात् मरीदवीनेंच निर्वाळा दिलाय्." गजरा मग गोपाळदादाकडे वळून बोलली, "गोपाळदादा! तुम्हीच आतां मनावर घेऊन ह्या प्रकरणाचा निकाल लावा ... सांवत्याला चांगला धडा शिकवा ... त्या नास्तिकाच्या अधर्मी आचरणामुळेंच आज उभ्या गांवाची होळी व्हायचा प्रसंग आलाय्!"

"हा चाललोंच ठाणेदाराकडे! ... चला, जानबा-अन्याबा!" असें म्हणत गोपाळदादा ताडकन् उठून चालूं लागतांच फुलाजीराव म्हणाला, "चला, मीही सांगतों ठाणेदाराला, कीं हे संभावित सैतान त्या सांवत्याला पाण्यांत पाहून विनाकारण छळताहेत!" ह्यावर लगेच गजरानें फुलाजीरावाच्या दंडाला धरलें आणि "तुम्हांला नकोत गांवाच्या उठाठेवी!" असें म्हणत घरांत ओढून नेऊन खोलींत ढकललें व दाराला बाहेरून कडी लावून घेतली!

गोपाळदादानें चावडीवर जाऊन "आत्तांच्या आत्तां सांवताला पंचांसमोर जाब विचारा ... पंचांना बोलावून आणा," अशी ठाणेदाराला गळ घातली.

पाटील आणि गुरव ह्यांच्याशीं संगनमत केलें. पंचांना बोलवायला जानबा गेला. सांवताकडे अन्याबाला धाडलें.

सांवता वाटेंतच भेटला. अन्याबानें त्याला थांबवून ठाणेदाराचा निरोप सांगितला. त्यावर "ठाणेदारांना म्हणावं, हऱ्या मांगाचा पोरगा पटकीनें हैराण झालाय्, त्याला औषध द्यायला निघालोंय् मी ... जराशानें येतों." असें म्हणून सांवता पुढें चालूं लागला.

पंच चावडींत जमले. तितक्यांत अन्याबानें सांवताचा निरोप ठाणेदाराला सांगितला. तो ऐकून गोपाळदादा भडकला. "बघा, बघा ठाणेदार! सांवत्या किती मुजोर, मग्रूर झालाय्! तुमच्या निरोपासरशीं हे पंच इथें धावून आले, पण हा सांवत्या ..."

"गांवच्या अधिकाऱ्याचाबी हुकूम बेलाशक धुडकावतुया." पाटील ओरडला.

"ठीक आहे. आपणच सांवताकडे जाऊं या." ठाणेदार शांतपणें म्हणाला.

"पण आत्तांच्या आत्तां ह्या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावून टाकूं या." रावजीशास्त्री नाकांत तपकिरीची चिमूट कोंबीत उद्गारले.

सर्व मंडळी सांवत्याच्या मळ्याकडे निघाली.

हऱ्या मांगाच्या मुलाला औषध देऊन सांवता घरीं परतला आणि अंगरखा-पागोटें चढवून तसाच लगेच चावडीवर जायला निघाला. तें पाहून जनाई म्हणाली, "आल्या पावलीं पुन्हा चाललायसां? ... जेवना-खानाचीबी सुदबुद न्हाई तुमास्नी! दोपार टळून गेली ... दीसभर उन्हातान्हांतनं हिंडतायसां ... अशानं हातरूण धरायची पाळी आली म्हंजे? ... उभ्या गांवाची तुमास्नी काळजी ..."

"अग, अडीअडचणींत ... दुखण्याबाण्यांत लोकांच्या उपयोगी पडायचं नाहीं, तर मग माणसानें जगायचं तरी कशाला?" सांवता म्हणाला.

"पर पुन्हा कुटं चाललायसां?"

"ठाणेदारांनीं तांतडीनें कशाला नोलावलंय् तें बघून येतों."

"अदुगर जेवा नि मग जावा. पोरगी वाढुळ तुमची वाट बघत बसलीया."

"म्हणजे? नागू, बाळ, अजून तूं जेवली नाहींस?"

"आमास्नी न्हाईंत भुका." नागू फुरंगटून बोलली.

"फुगवले गाल! खुळी कुठली! तुम्ही जेवून घ्या. मी आलोंच आत्तां." असें म्हणून सांवता चावडीकडे निघाला, तोंच त्याला समोरून ठाणेदार, पाटील, गुरव, गोपाळदादा, शास्त्रीबुवा, जानबा, अन्याबा, वगैरे मंडळी येतांना दिसली. सांवता जनाईला म्हणाला, "अग, ठाणेदारच इकडे आले. लवकर कांबळीं अंथर बाहेर अंगणांत...आज इथेंच भरणार वाटतं पंचांची बैठक."

"पर भलत्या येळीं कशाला हाकड आली ही समदी टोळधाड?" असें पुटपुटत जनाईनें अंगणांत बैठक घातली.

सांवतानें सर्वांचें हात जोडून सुहास्यमुखानें स्वागत केलें.

"यावं ... यावं ... ठाणेदार! या मंडळी! आज बरी गरिबाची आठवण झाली. तुमचा निरोप कळला ... निघालोंच होतों मी चावडीकडे ..."

"आत्तांच भाईरनं आलंत. अजून जेवायचंबी हैत." मध्येंच दाराआडून जनाई बोलली.

"तिसरा प्रहर टळत आला नि अजून जेवण व्हायचं आहे? मग इतका वेळ काय देवपूजा चालली होती वाटतं?" रावजीशास्त्र्यानें खंवचटपणानें विचारलें.

"आमची देवपूजा तर अष्टौप्रहर चालूच असते." सांवता शांतपणें उत्तरला.

"बघा, शास्त्रीबुवा! अष्टौप्रहर देवपूजा! केवढा कर्मठ देवभक्त हा! ... पण काय रे सांवत्या, तुझ्या घरांत पांडुरंगाची ... देवाची टीचभर मूर्ति तरी आहे का रे? म्हणे देवपूजा!" गोपाळदादानें टवाळी आरंभली.

"अहो, आपणांसारख्या थोरामोठ्यांची सेवा चाकरी ... गोरगरिबांचा ... अनाथ-अपंगांचा परामर्श नि शेतमळ्याची निगा-निगराणी हीच आमची देवपूजा ! हा मळा म्हणजेच माझ्या देवाचा देव्हारा !"

"नि हे—हे कांद्यांचे, गाजर-मुळ्यांचे ढीग म्हणजे त्या देव्हाऱ्यांतल्या देवमूर्ति !" असें म्हणून गोपाळदादा मोठ्यांदा हसूं लागला.

"अगदीं खरं बोललांत, गोपाळदादा !" सांवता बोलला आणि त्याच क्षणाला त्याच्या मुखांतून सहजस्फूर्तीनें बोल उसळले :

कांदा, मुळा, भाजी । अवघी विठाबाई माझी
लसूण, मिरची, कोथंबिरी । अवघा झाला माझा हरी !
ऊंस, गाजर, रताळूं । अवघा झालासे गोपाळू
मोट, नाडा, विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी !
सांवता म्हणे केला मळा । विठ्ठलपायीं गोविला गळां !

"कसे देव्हारे माजवतोय् बघा, आपल्या मळ्याचे !" पाटील गुरवाच्या कानाशीं पुटपुटला. रावजीशास्त्री खोंचक स्वरांत सांवताला म्हणाला, "म्हणजे तो विठोबा तुझ्या मळ्यांत मुक्कामालाच येऊन राहिलाय् म्हणायचा !"

"होय. नि त्या विठोबाला म्हसोबाची अडचण व्हायला लागली, म्हणून तर त्या म्हसोबाची त्यानें दूर हकालपट्टी केली !" गोपाळदादा असें बोलल्यावर सांवताची हसून हेटाळणी करायला सर्वांना चांगलाच चेव चढला.

सांवतानें आणि नागूनें केळीं, पेरू, संत्रीं, भाजलेल्या शेंगा, उकडलेलीं रताळीं, वगैरे खूप खाद्यपदार्थ मंडळीपुढें आणून ठेवले होते. त्यांवर यथेच्छ ताव मारीत ते कुटाळ लोक सांवताचीच तावातावानें निंदा-निर्भर्त्सना करीत होते. ठाणेदाराला मात्र त्यांचा तो खोडसाळपणा

आवडला नाहीं. सर्वांना खडसावून त्यानें गप्प केलें आणि सांवताला म्हटलें, "सांवता, तूं आपल्या शेतांतला म्हसोबा हलवलास..."

"त्येचा तुला जाब इचाराया हे गांव चं पंच-परमेसर तुझ्याकडे आलंत." पाटील पुन्हा असें मध्येंच बोलतांच ठाणेदार खेकसला, "पाटील, तुम्ही मध्यें तोंड घालूं नका." नि मग सांवताला सौम्य स्वरांत तो बोलला, "तूं म्हसोबा हलवलास म्हणून तो कोपला आणि त्यामुळें गांवांत पटकीची साथ भडकली, असा गांवकऱ्यांचा दावा आहे."

"पण माझ्या शेतांतला म्हसोबा गांवावर कशाला कोपेल? तो कोपलाच तर माझ्यावर कोपेल ... मीं त्याला हलवला..."

"कां हलवलास?"

"तो माझा प्रश्न आहे."

"नाहीं, नाहीं. हा प्रश्न आतां तुझा एकट्याचा नाहीं... साऱ्या गांवाचा आहे." गोपाळदादा म्हणाला, "म्हणून पंचांचं म्हणणं असं आहे, कीं तूं म्हसोबा पुन्हा पूर्वीच्या जागीं ठेवून दे!"

"नि पंढरपूरला जाऊन प्रायश्चित्त घे." रावजीशास्त्री उद्गारला.

"पंढरपूरला जाऊन प्रायश्चित्त घेऊं?"

"कां? पंढरपूरला जन्मांत कधीं जायचं नाहीं, अशी शपथ घेतली आहेस वाटतं?"

"तसं कांहीं नाहीं. जाईनही सवडीनें कधीं तरी. पण प्रायश्चित्त म्हणून मात्र मुळींच जाणार नाहीं." सांवता निश्चयी स्वरांत बोलला. त्यावर ठाणेदार समजुतीच्या स्वरांत म्हणाला, "सांवता! सांवता! गांवासाठीं कांही गोष्टी कराव्या लागतात."

"गांवगंगेची सेवा मी यथाशक्ति करीतच आहें कीं!"

"काय केलं आहेस रे तूं गांवासाठीं? प्रत्येक बाबतींत गांवकऱ्यांच्या उलट वागणारा तूं!"

"पन ह्यो तुजा हेकडपना आतां आमी न्हाई चालू देनार!" ताडकन् उठून पाटील म्हणाला, "पुन्हा बजावतों... गांवकऱ्यांचं मन मोडून न्हाई निभायचं... गांवांत ऱ्हायचं तर गांवापरमानं चाललं पहिजे... आमी सांगूं त्यें गुमान ऐकलं पाहिजे..."

"शक्य नाहीं. माझ्या मनाला योग्य वाटेल, पटेल, तसाच मी वागणार!"

"बग्गूं-बग्गूं! तुजं चालतंयू कीं आमचं? चला, मंडळी!"

"पांडुरंगाची मर्जी!" सांवतानें सर्वांना हात जोडून निरोप दिला.

जातां जातां ठाणेदार पंचांना म्हणाला, "तुम्ही कांहीं म्हणा, सांवता खरा सज्जन, संभावित माणूस आहे. कुणाच्या आल्यांत नाहीं, गेल्यांत नाहीं ... नि प्रेमळ, परोपकारी तरी किती! तुम्ही मात्र त्याचा पाहुणचार घेऊन, त्याचं तोंडभर खाऊन उलट त्याचीच तोंडावर निंदा केलीत! हें शोभलं नाहीं तुम्हांला."

"तुम्ही असे तोंड भरून नेहमीं त्याचे गुण गातां, म्हणूनच तो एवढा शेफारलाय्!" गोपाळदादानें ठाणेदाराला टोला मारला. पाटलानें नेहमीं प्रमाणें 'बग्गूं-बग्गूं' करीत मिशीला पीळ भरला.

# कुंपणानेंच शेत खाल्लें

गांवांतली महामारीची सांथ गेली. मरीआईचा नवस फडण्याचा दिवस उजाडला. देवीपुढें बळी देण्यासाठीं घरटीं एक एक बकरें जमवून गांवकऱ्यांनीं वाजत गाजत बकऱ्यांची मिरवणूक काढली. लहान-थोरांनीं त्या बकऱ्यांवर गुलाल-फुलें उधळलीं. सांवतानें मात्र बकरें तर दिलेंच नाहीं, पण बकऱ्याऐवजीं वर्गणीही दिली नाहीं. त्यामुळें पाटील, गुरव, गोपाळदादा, वगैरे सांवताच्या वाइटावर असलेली मंडळी खूप चिडली. त्यांनीं गांवकऱ्यांना चिथावलें. गजरानेंही आगींत तेल ओतलें. शेवटीं, गांवकऱ्यांनीं ठरविलें, कीं सांवत्याचीं सगळीं बकरीं चोरायचीं नि मरीआईपुढें कापायचीं !

पानें वाढलीं होतीं. सांवता नि नागू जेवायला बसणार, इतक्यांत मिरवणुकींतल्या बकऱ्यांचें केविलवाणें ओरडणें ऐकूं आलें. नागू कळवळून म्हणाली, " बाबा, बाबा ! कशीं वो बकरीं वराडत्यात ! "

" हूं ! " लांब उसासा टाकून सांवता म्हणाला, " पण त्या मुक्या प्राण्यांचं ओरडणं गांवकऱ्यांना कुठें ऐकूं येतंय् ? "

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर



अनुक्रमांक ... ९६८८ नों. दि. ...

" पर तुमी कां उगीच जिवाला तरास करून घेतायसा? ... लागा जेवायला ... " जनाईनें असें म्हणतांच सांवता भाताचा पहिला घास उचलून तोंडांत घालूं लागला, तोंच त्याच्या बकऱ्यांचें ओरडणें त्याला ऐकूं आलें. हातांतला घास तसाच टाकून सांवता चटकन् पानावरून उठला नि बाहेर आला. नागूही त्याच्या पाठोपाठ आली. जानबा नि अन्याबा सांवताचीं बकरीं चोरून ओढून नेत होते. तें पाहून सांवता क्षणभर दिङ्मूढ झाला. पण मग तसाच मिरवणुकीकडे धावत सुटला.

सांवताचीं बकरीं मिरवणुकींत सामील होतांच गांवकरी आनंदानें ओरडले, " सांवताचीं बकरीं ! एक सोडून दोन ! "

" त्यो सांवत्या आतां काय करतोय् त्यें बग्गूं-बग्गूं ! " पाटलानें मिशीवर ताव दिला.

मरीआईच्या देवळापुढें येऊन मिरवणूक थांबतांच वाद्यांचा गजर सुरू झाला. पाटील हात जोडून म्हणाला, " आई ! मरीआई ! लेकरांनीं आनलेला हा निवद ग्वाड करूनशान घेग बाई ! " नि मग गांवकऱ्यांना त्यानें फर्मावलें, " वाढा निवद ... कापा बकरीं ! परतम सांवत्याचीं ! "

तेवढ्यांत " थांबा थांबा ! " असें ओरडत सांवता तेथें धावत आला नि हात जोडून म्हणाला, " हात जोडतों तुम्हांला. मुक्या जिवांची हत्या करूं नका. " सांवतानें आपलीं बकरीं मागें ओढलीं. त्याला बाजूला ढकलीत पाटील गरजला, " चल, हाट बाजूला ... मऱ्याईच्या तोंडांतला घास काढाया आलास ? "

" मरीआई ! ... पण साऱ्या जगाची ही आई आपल्या लेकराचा घास खाईल तरी कशी ? "

" बग कशी खाईल ती ! ... वडा रं बकरीं ! "

" नाहीं नाहीं, माझीं बकरीं मी देणार नाहीं. "

" देवाधर्मांच्या आड येत्तोस ? " गोपाळदादानें विचारलें.

" म्हसोबालाबी दगड म्हणून ठोकरनारा ह्यो ! ह्याला देव दिसतुया कुटं ? "

" मला तर सर्वत्र देव दिसतोय्. " सांवता म्हणाला.

" मग मरीआई, म्हसोबा देव नव्हत ? "

" कोण म्हणतो नव्हत म्हणून. पण तुम्ही ह्या देवांना दगडाची अवकळा आणलीत ! माणुसकी सोडून देवाधर्मांच्या नांवाखालीं मुक्या जिवांची क्रूर हत्त्या करतांय् तुम्ही ! तुम्हांला ह्या दगडांत देव दिसतोय्, पण ह्या जित्या जिवांत मात्र देव दिसूं नये अँ ! शास्त्रीबुवा ! गोपाळदादा !..गांवकरी अडाणी असतील, पण तुम्ही तर शहाणेसुतें आहांत ना ? तुम्ही अशा हिंसेला कसं उत्तेजन देतां ?... वारकरी वैष्णव तुम्ही ! ... वैष्णवजनांचं ब्रीद म्हणजे ... "

पण सांवताचें बोलण पुरें व्हायच्या आंतच पाटलाच्या नि गोपाळदादाच्या इशाऱ्यावरून लोकांनीं गिल्ला करून सांवतावर चहूंकडून एकदम हल्ला चढविला. तितक्यांत शिवबा, काशीबा, फुलाजीराव तेथें धावत आले. त्यांनीं सांवताला पाठीशीं घातला. लोकांना उद्देशून शिवबा म्हणाला, " अरे, एका सत्पुरुषाच्या अंगावर असं तुटून पडतां ? थूः तुमच्या जिनगानीवर ! कसला माज चढलाय् तुमास्नी ?... अन् पाटील ! तुम्ही गांवचं अधिकारी ! तुम्ही असल्या मारामारीला साथ देतांय् ? कुंपणच शेत खाऊं लागलं म्हणायचं ! "

" पर मऱ्याईचा नवसाचा निवद उधळतोय् ह्यो सांवत्या. " पाटील बोलला, " पुन्हा पटकीचा आगडोंब उसळावा म्हंतोस व्हय ? "

" आमचीं पोरंबाळं पटकीनं पटापट मरावीं, म्हंतोस व्हय ? " गुरवानें पाटलाच्या सुरांत सूर मिळवला.

" अरं, काय बरळतांय् हें ? " शिवबा म्हणाला, " ह्याच देवमाणसानं तहानभूक विसरून सांथींत तुमास्नी ... तुमच्या पोरांबाळांस्नी औषधपाणी केलं ... त्यांना काळाच्या दाढेंतनं वांचवलं ... "

"व्हय. पर त्योच पुन्हा समद्या गांवाला काळाच्या दाढखालीं रगडाया निघाला, नव्ह ? म्हन बकरं बळी देऊं नका..."

"मग काय, ह्या बोकडाला बळी द्यायचा ?" गोपाळदादानें विचारलें.

"द्या-द्या माझा बळी द्या. गांवासाठीं स्वतःचं बलिदान करायला हा सांवता आनंदानें तयार आहे !"

"येळ आली तर तुजाबी बळी देऊं ! पर आज अदुगर तुजीं बकरीं..."

पाटील सांवताच्या हातांतून बकरीं ओढून घेऊं लागला. शिवबा-काशिबांनीं त्याला जोरानें मागें ढकललें. पाटील जमिनीवर कोलमडला. लोक जास्तच खवळले. जंगी हाणामारी सुरू झाली. सांवताच्या रोखानें आलेले काठ्या-लाठ्यांचे तडाखे काशीबा-शिवबांनीं आपल्या अंगावर झेलले. त्या धुमश्चक्रींत फुलाजीराव बकऱ्यांच्या अंगावर कोसळला. सगळीं बकरीं चहुंकडे उधळलीं. तेवढ्यांत सांवताच्या डोक्यावर कोणींतरी पाठीमागून काठीचा जबर तडाखा हाणला. सांवता मूर्च्छित पडला. त्यासरशीं लोक घाबरून पळाले. गर्दी पांगली.

शिवबा-काशिबांनीं सांवताला तसेंच उचलून आपल्या घरीं नेलें.

गोपाळदादानें गांवकऱ्यांना तंबी दिली, "सांवत्यानें उघड उघड गांवाचं वैर पत्करलंय्. आतां ह्यापुढें जो कोणी त्याच्याशीं कसलाही संबंध ठेवील, तो गांवाचा दुष्मन समजला जाईल ! याद राखा !"

मूर्च्छित पडलेल्या सांवताला शिवबाच्या घरीं औषधोपचार सुरू झाले. जनाईनें नि नागूनें रडून आकांत केला. त्या मायलेकींचें सांत्वन करतांना शिवबाच्या पत्नीला... गिरिजेला पुरेवाट झाली. कांहीं वेळानें सांवता शुद्धीवर आला. त्यानें डोळे उघडले. सर्वांना हायसें वाटलें.

इकडे गोपाळदादा, पाटील, गुरव, वगैरे मंडळींनीं मसलत करून भयंकर कारस्थान रचलें. 'सांवत्याला जन्माची आठवण राहील अशी कडक शिक्षा केली पाहिजे. मला म्हणजे सांवत्याचा प्राण ! त्याचा रातोरात

फडशा पाडायला पाहिजे.' असा दुष्ट बेत करून तो त्याच रात्रीं लगोलग त्यांनीं अंमलांतही आणला.

जानबा-अन्याबांनीं सांवताचा शेतमळा कापून काढला. त्याचें घर जमीनदोस्त केलें. विहीर बुजविली. गुरेंढोरें पळवून लावलीं ! जय नि विजय हे दोन बैल मात्र दावें तोडून उधळले, ते त्या चांडाळांच्या हातीं लागले नाहींत.

सकाळीं गांवांत सांवताच्या मळयावर दरोडा पडल्याची हाकाटी झाली. जनाई, काशीबा, शिवबा, गिरिजा, सर्वांनाच पेंच पडला. घायाळ होऊन बिछान्याला खिळलेल्या सांवताला ही भयंकर वार्ता कोणीं नि कशी सांगायची ? काळजाला धक्का बसून सांवतानें हाय खाल्ली तर ?

सांवतानें तर मळयाचा ध्यासच घेतला होता. सकाळपासून चारदा उठून तो मळयाकडे जायला निघाला होता. पण कांहींतरी सबबी सांगून काशीबानें त्याला थोपवून धरलें होतें. जनाईनें न्याहारी करायला सांगतांच त्यानें तिला विचारलें, "मळयाला पाणी पाजवल्याशिवाय, आजवर कधीं तरी मीं न्याहारी केली आहे का ?"

अखेर, सर्वांच्या नजरा चुकवून सांवता शिवबाच्या घरांतून बाहेर पडला नि तडक मळयावर गेला.

पण तेथें जाऊन पाहातो तों काय ! घरदार, विहीर, शेतमळा, बागा, गुरेंढोरें ... सर्वांचाच संपूर्ण सत्यानाश झालेला ! सांवता हतबुद्धच झाला.

"अरेरे ! पंढरीनाथा ! पांडुरंगा ! काय केलंस हें ? माझ्या हातून काय चुकलं ? एवढी भयंकर शिक्षा मला कां रे दिलीस ? माझ्यावर असा कां रुसलास बरं ? ... माझी पूजा आज ढासळली ... माझी सेवा तुला आवडली नाहीं का ?" असेंच कांहींतरी बडबडत तो त्या ओसाड, उजाड मळयांतून वेड्यापिशासारखा बराच वेळ हिंडला नि शेवटीं, "पांडुरंगा ! पांडुरंगा !" असा केविलवाणा टाहो फोडीत म्हसोबापुढें जाऊन उंबराच्या झाडाखालीं त्यानें धाडकन् धरणीवर अंग टाकलें !

# पहाटेच्या प्रहरीं स्वप्न

कोणालाही न सांगतां-सवरतां शिवबाच्या घरांतून सांवता निघून गेल्यावर जनाईनें सहज त्याच्या खोलींत डोकावलें. सांवताचा बिछाना रिकामा पाहून तिच्या काळजाचा थरकांप झाला. सांवता मळ्याकडेच गेला आहे, हें तिनें तात्काळ ताडलें. मळ्याचा सर्वस्वीं नायनाट झालेला पाहून त्याच्या हळव्या मनाला केवढा धक्का बसेल, त्याची काय अवस्था होईल, ह्याची तिला कल्पनाही करवेना. तिच्या जिवाचें पाणी पाणी झालें. शिवबाला घेऊन ती तशीच घाबऱ्या घाबऱ्या मळ्याकडे धावली.

नंदनवनासारख्या बहरलेल्या सांवताच्या मळ्यावर एका रात्रींत भयाण, भीषण अवकळा पसरलेली पाहून शिवबाच्या डोळ्यांतून आसवें घळघळलीं. तो उद्गारला, "सांवताच्या काळजाचाच लचका तोडला जनुं त्येच्या हाडवैऱ्यांनीं!"

आपला सोन्यासारखा संसार उधळला गेला... घरदार भुईसपाट झालें...बागमळा उध्वस्त झाला...उभीं पिकें कापलीं गेलीं ... हें

पाहून जनाईला तर डोक्यावर आभाळ कोसळल्यासारखें झालें. पण ती साध्वी मोठ्या धैर्याची. आपलें दुःख आंतल्या आंत गिळून, डोळ्यांतून पाण्याचा टिपूसही न काढतां, उलट सांवतालाच धीर देण्यासाठीं ती त्याला भिरभिरत्या नजरेनें मळ्यांत धुंडाळूं लागली.

दूर बांधावर म्हसोबाजवळ उंबराच्या झाडाला टेकून सांवता शून्य, निर्विकार मुद्रेनें दगडाच्या पुतळ्यासारखा निश्चल बसून राहिला होता. त्याचें मन कमालीचें खिन्न, सुन्न होऊन गेलें होतें. जनाई नि शिवबा त्याच्याजवळ जाऊन बसले. काय बोलावें तेंच त्यांना सुचेना. बराच वेळ तीं दोघें गप्पच होतीं. शेवटीं शिवबा म्हणाला,

"सांवता ! तूं आतां हा गांव सोडून जावंस, हेंच चांगलं. आतां तुजा निभाव ह्या गांवांत लागेलसं दिसत न्हाई ... जळांत राहून माशांशीं वैर कुठवर निभनार, बाबा ?"

"अक्षी आभाळच फाटलंया. पर असा धीर सोडून ... हातपाय गाळून कसं भागल ?" जनाई बोलली. सांवता कांहींच बोलला नाहीं. त्यानें त्या दोघांकडे पाहिलही नाहीं.

'डुईवर छप्पर तर हवं,' असें म्हणून शिवबा-काशिबानीं सांवताच्या घराची दुरुस्ती आरंभली. गांवांतलींही चार दोन माणसं आपण होऊन त्यांच्या मदतीला आलीं. पण हें कळतांच पाटील, गोपाळदादा, जानबा, अन्याबा ही चांडाळचौकडी तेथें येऊन थडकली. मदतीला आलेल्या लोकांना पाटलानें दम भरला,

"अर गाढवांनो ! काय करतायसा हें ? तुमास्नीबी गांवाशीं दुस्मनी जोडायची हाय व्हय ? सांवत्याचं घर पुना उबं करताय् ? पर तुमचं घर बसल कायमचं. याद राखा. व्हा चालत इथून ..."

ते लोक कांहींच बोलले नाहींत. मुकाट्यानें आपलें काम करीत राहिले. शिवबा पाटलाला म्हणाला, "जगांत तुज्यावानीच समदी मानसं हलकट

हैत व्हय? अरं, भलीं मानसंबी जगांत हैतच की! म्हनून तर जग चाललंया."

त्यावर गोपाळदादा चवताळला, "शिवबा! तोंड सांभाळून बोल. सांवत्याची कड घेऊन पाटलांना बोलतोस? पुन्हा मऱ्याईचा कोप ओढवून घ्यायचा आहे होय? तुमचाही निकाल लागेल सांवत्याच्या नादानें. गुमान आपल्या घरीं जाऊन बसा. बजावून ठेवतों."

"अरं, जा-जा काळतोंड्या!" काशीबा उसळला, "म्हनं मऱ्याईचा कोप! ठावं हाय आमास्नी कोनती मऱ्याई नि कोनता म्हसोबा सांवतावर कोपलाय् त्यें! सावकारणीचा भुत्या तूं!... तिचा उदो उदो करीत तिच्याम्होरं गोंडा घोळीत हिंड जा!"

गोपाळदादा खवळला. हातांतले कागद दाखवीत तावातावानें ओरडला, "हें बघा. तुमचं नशीब माझ्या मुठींत आहे...हे तुमच्या सावकाराच्या कर्जाचे कागद! शिवबा! काशीबा! पुन्हा सांगतों, मुकाट्यानें घरीं जाऊन बसा. नाहींतर तुम्हांलाही सांवत्याच्या जोडीला झाडाखालीं बसावं लागेल!"

"कर्जापायीं तुमच्याबी घरादाराचा लिलांव पुकारीन!" पाटील बोलला.

"अरं, जा-जा. काय करायचं त्यें करून दावा. उगाच बडबडूं नगा." पाटलाच्या अंगावर धावून जाऊन काशीबा खेकसला. पाटील चमकून मागें हटला, नि 'बग्गूं-बग्गूं' करीत मिशांना पीळ भरीत आपल्या साथीदारांसह तेथून पसार झाला.

दुपारीं सांवताकडे गिरिजा जेवण घेऊन आली. सांवता सकाळच्या-सारखा अजूनही तसाच भकास मुद्रेनें स्वस्थ बसून होता. त्याची ती अवस्था पाहून कळकळीच्या स्वरांत गिरिजा बोलूं लागली, "देवाचा कोप! दुसरं काय? एका रात्रींत फुलत्याडुलत्या मळ्याचं सपाट, उजाड माळरान बनलं!... हा म्हसोबा शेतांतन कशाला हलवलास?... मऱ्याईला बकरं कां न्हाई दिलंस?... गांवांत राह्यचं, तर दिसल त्या दगडाला देव

समजून दंडवत घालाया हवा ! न्हाई तरी तुज लक्ष देवाधरमाकडे कमीच. पंढरीला जाऊन कंदी इटोबाचं दरसनबी घेतलं न्हाईस तूं! येकदा ये जाऊन पंढरीला !... देवाच्या दयेनं पुना समदं गाडं सुरळीत व्हईल !... असं निसती काळजी करीत गुमान बसून काय व्हनार, बाबा ? ... ऊठ, घे खाऊन भाकरी ! ”

गिरिजेची बडबड सांवताच्या कानांत शिरलेली दिसली नाहीं. तो तसाच शून्यांत दृष्टि लावून मख्खासारखा बसून होता. तें बघून गिरिजा बोलली, “ देवा ! देवा ! तूं तर देवागत गप्पच ! बोलत न्हाईस ... भाकरीकडे बगतबी न्हाईस ... ”

शेवटीं कंटाळून भाकरीचें बोचकें तेथेंच ठेवून गिरिजा तेथून उठली नि जनाईकडे निघाली. नव्यानें उभारलेल्या खोपटांत ... खोपट कसलें म्हणा ! चार भिंतींचा केवळ आडोसाच तो ! कारण, वरती अजून छप्पर नव्हतेंच ! .... जनाई घरकामांत गुंतली होती. तुळशी-वृंदावनांत नागू तुळशीचें नवें रोपटें लावीत होती. तितक्यांत गिरिजा येऊन म्हणाली, “ जनाई ! तुजा दादला तर काईंच बोलत न्हाई ... भाकरीकडे बगतबी न्हाई ! ”

ह्यावर जनाई बोलली, “ तुमी एवढं कळकळीनं आनतायसा ... पर सांगितलं ना ? त्ये दुसऱ्याकडच कंदीबी खानार न्हाईत ! ”

“ पन आमी कुनी परक हाय व्हय ? ”

“ न्हाई. पर ह्ये त्येस्नी उमजाया हवं ना ? पोरगीबी सकाळपास्नं उपाशीच हाय. ”

हें ऐकून गिरिजा नागूचं तोंड कुरवाळीत तिची समजूत घालूं लागली ... “ नागू ! पोरी ! असं ग काय करावं येड्यावानी ? चल, खाऊन घे तुकडा ... माझा बाबा तो ... त्वांड कसं पार सुकून गेलंय् ... चिमनीवानी झालंय् ... तूं खाल्याबिगर तुजी आई कशी बरं खाईल ? मोठ्या माणसाचं ऐकावं लहानांनीं ... मी भरवूं तुला ? ”

“ नग-नग ! . . . बाबांनीं खाल्याबिगर मी न्हाई खानार. ”

“ त्ये न्हाई खानार दुसऱ्याच्या घरचं अन्न. ”

जनाईचें हें बोलणें ऐकून नागूच्या मनांत काय आलें, कोणास ठाऊक ! ती तशीच मळ्यांत धावतपळत सांवताकडे गेली. सांवता डोळे मिटून बसूनच होता. गिरिजेनें आणलेली भाकरीची पोटळी तशीच तेथें पडली होती. तिच्याकडे नि सांवताकडे नागूनें एकदोनदा आळीपाळीनें पाहिलें नि मग मळ्याकडे नजर टाकली. तिला एक-दोन गाजरें नि रताळीं दिसलीं. तिनें तीं धावत जाऊन घेतलीं नि आणखी कांहीं सापडतात का हें बघण्यासाठीं ती मळ्यांतून हिंडूं लागली.

तिन्हीसांज झाली. विसकटलेल्या प्रपंच-पसाऱ्याची नीट आवरासावर करून, दोन गोधड्या घेऊन जनाई मळ्यांत सांवताजवळ आली नि म्हणाली, “ अवो, दीसभर कसला इचार करीत बसलायसा ? खाऊन घ्या भाकर-तुकडा . . . मायेचीं मानसं आपुलकीनं इचारपूस करत्यात, पर तुमास्नी कायबी कसं न्हाई त्येचं ? खाऊन घ्या . . . आमच्याबी तोंडांत पानी न्हाई कालपास्नं . . . उठा म्हंते ना . . . ” जनाईनें सांवताला गदागदा हालविलें, पण हूं कीं चूं केलें नाहीं त्यानें. जनाई वैतागली. “ काय बाई ह्यो चिमत्कार ! समाधीच लागलीया जनुं ! तुमी असं नि ती पोरगी तशी ! माजंच मरण आलंया मधल्यामधीं ! ”

अखेर कंटाळून तिनें सांवताच्या अंगावर गोधडी घातली. नि मग आपणही तोंडावरून दुसरी गोधडी पांघरून घेऊन तेथें त्याच्याशेजारींच ती जमिनीवर लवंडली. दमून गेल्यामुळें तिचा लगेच डोळा लागला.

तितक्यांत मळ्यांतलीं गाजरें, रताळीं घेऊन नागू तेथें धावत आली आणि हळूच सांवताच्या मांडीवर बसून तिनें त्याच्या गळ्यांत आपला चिमुकला हात टाकला. सांवतानें किंचित् डोळे किलकिले करून तिच्याकडे पाहिलें. नागूनें त्याचा हात घेऊन आपल्या गळ्यांत टाकला. दोघेंही बराच वेळ एकमेकांकडे भरल्या नजरेनें पाहात राहिलीं.

मग नागू म्हणाली, "बाबा! वाईट वाटतंया व्हय तुला? मळ्याचा मालक रागावल म्हून? पर घाबरूं नगं हं! मी सांगेन त्येला, माझ्या बाबाची कायबी चूक न्हाई! माझा बाबा तो!" सांवताचें तोंड आपल्या चिमण्या हातांनीं कुरवाळून नागूनें त्याच्या तोंडांत गाजर घालीत म्हटलें, "खा–खा! दुसऱ्याकडलं नव्हं... आपल्याच मळ्यांतलं हाय!"

नागूचे हे भाबडे, प्रेमळ बोल ऐकून सांवता एकदम सद्गदित झाला. तो तेंच गाजर नागूच्या तोंडांत घालूं लागला. लगेच गिरिजेनें तिच्या बाबतींत दुपारीं उच्चारलेले शब्दच पोक्तपणाचा आव आणून ती सांवताला ऐकवूं लागली, "ह्यें काय बरं असं? पोरानं खाल्याबिगर आई कशी खाईल? माझा बाबा तो! त्वांड कसं पार सुकून गेलंय्... चिमनीवानी झालंय्... खा-खा... मोठ्या मानसाचं ऐकावं लहानांनीं... मी भरवतें हं तुला!..." नि मग नागू नि सांवता गाजराचा एक एक तुकडा मोडून एकमेकांच्या तोंडांत घालून खाऊं लागलीं. नागू आनंदली. जनाईला हालवून उठवीत ती उद्गारली, "अग, आई! आई! ऊठ! ऊठ! आमी काय खातुंया बग... तूंबी खा... ऊठ!"

जनाईनेंही उठून गाजरें-रताळ्यांचा फलाहार केला नि मग तीं तिघंही तेथेंच उघड्यावर झोपीं गेलीं.

पहाटेच्या प्रहरीं सांवताला स्वप्न पडलें. नागूच्या ठिकाणीं श्रीपांडुरंगाची बालमूर्ति प्रकट झाली. तिनें सांवताला हाताला धरून उठविलें... त्याच्या हातीं नांगर देऊन त्याला शेत नांगरायला लावलें... नांगरतांना जमिनींतून साक्षात् देवी लक्ष्मी वर आली आणि तिनें सांवताच्या मस्तकावर आपला मंगल वरदहस्त ठेवला!... असें अद्भुतरम्य दृश्य सांवतानें स्वप्नांत पाहिलें.

तो दचकून उठला. तेवढ्यांत कोंबडा आरवला. पांखरांचा किलबिलाट सुरू झाला. तसाच मग एकदम उठून सांवता घराकडे निघाला. नागू नि जनाई देखील लगबगीनें उठून त्याच्या मागोमाग चालूं लागल्या.

## आम्ही दुनियेचे राजे !

एखाद्या मंत्रमुग्धासारखा सांवता सरळ समोर पाहात घराजवळ आला. पूर्वीच्या घराच्या जागेवर केवळ दगडा-मातीचाच प्रचंड ढिगारा दिसत होता. पण तिकडे ढुंकूनही न बघतां सांवतानें कुळव-नांगर उचलला नि मळ्याची वाट धरली. हें पाहून जनाईनें विचारलें, "अवो, नांगरायला निघालासा, पर बैल हैत का जाग्यावर ?"

सांवता थबकला. तितक्यांत दूरवर पाहात नागू ओरडली, "बाबा, बाबा ! ती बगा, आपली जय-विजयाची जोडी ! तकड बांधावर चरतीया !" नि मग तिनेंच बैलांना साद घातली. नागूचा आवाज कानांवर पडतांच ती बैल-जोडी टवकारलेल्या कानांनीं चौखूर उधळतच सांवतासमोर येऊन उभी राहिली. सांवतानें हर्षभरानें, कौतुकानें त्या बैलांना कुरवाळलें, ... त्यांच्या पाठीवरून मायेचा हात फिरविला नि त्यांना घेऊन तो मळ्याकडे चालूं लागला. तेव्हा जनाई पुन्हा म्हणाली, "पर पान्याबिगर काय करनार ? समदी हीर बुजलीया !"

सांवतानें विहिरीजवळ जाऊन पाहिलें, तर खरोखरीच दगडा-मातीनें, झाडाच्या फांद्यांनीं, पाला-पाचोळयानें विहीर कांठापर्यंत भरली होती. जागजागीं मुद्दाम पाडलेली दिसत होती. सांवतानें मग कुळव-नांगर ठेवून दिला नि कुदळ-फावडें घेऊन तो औदुंबराच्या झाडाजवळ गेला. "जय पांडुरंग!" असें म्हणून औदुंबरापासून दहा-पंधरा हातांच्या अंतरावर त्यानें कुदळीचा पहिला घाव घालतांच जनाई त्याच्याकडे आश्चर्यानें आ वासून पाहातच राहिली.

"आतां काय म्हनावं ह्या येडाला? काय चालवलंयसा काय?"

"पांडुरंगाची सेवा! पांडुरंगानें नेमून दिलेलं काम!"

"परपंचाचा समदा इस्कोट झालाया ..."

"होऊं दे ग!" सांवता निर्धारानें म्हणाला, "पुन्हा पहिल्यापासून तपश्चर्या सुरू करूं या!"

"पर एकल्याच्यानं काय व्हनार?"

"माझ्या भक्तीचा मळा मी पुन्हा नव्यानें फुलवणार!"

"पर मदतीला कोन हाय का?"

"होय तर! हे आपले हात! आपले हात काम करूं लागले, कीं देवाचा हात धावतोच मदतीला!"

"नवी हीर खनतायसा जनुं! पर हतंच पानी लागल कशावरून?"

"इथेंच पाणी लागणार! औदुंबराखालीं दत्तमहाराज वसतीला असतात ... देवाच्या दयेचा झरा इथेंच झुळझुळणार ... इथेंच पाणी लागणार!" जनाईशीं बोलतांना सांवताचें खणणें चालूच होतें.

दिवसभर अविश्रान्त खणण्याचें काम करून संध्याकाळीं सांवतानें आपल्या नव्या खोपटांत प्रथमच पाऊल टाकलें. चहूंकडे नजर नाचवीत तो कौतुकानें उद्गारला, "जनाई! किती ग हुशार तूं! विस्कटलेला प्रपंच-पसारा किती झटपट नीटनेटका केलास! मलाही माझा मळा असाच लवकर पहिल्यासारखा पिकवतां आला, तर काय बहार होईल!"

ह्यावर हसत हसत जनाई बोलली, " अवो, पर खालतीं काय बगतायसा ? वाईच वरतीं बगा की ! "

" वा: ! फारच छान ! " वर पाहात सांवता बोलला, " आडोशासाठीं चार भिंती उभ्या ! नि वरतीं आभाळाचं छप्पर ! उत्तम !...स्वच्छ चांदणं कसं घरभर सांडतंय ! हवाच हवा ! उजेडच उजेड ! राजवाड्याची शोभा आली आहे ह्या आपल्या चंद्रमौळी खोपटाला ! "

" व्हय तर ! मग खावा हीं राजवाड्यांतलीं पक्वान्नं पोटभर. " उकडलेलीं गाजरें नि रताळीं जनाईनें सांवताच्या पानांत वाढलीं.

रताळीं खात खात सांवता म्हणाला, " किती गोड लागतात हीं रताळीं ! कसं झालं तरी आपल्या कष्टाचं अन्न हें ! अमृताची रुचि आहे ह्याला. "

" ह्येंच आतां खायचं. दुसरं हाय काय घरांत खायला ? "

" अग, पूर्वीचे ऋषिमुनि अशीं कंदमुळं खाऊनच खडतर तपश्चर्या करीत होते. "

" आमचंबी त्येंच चाललंय् कीं ! "

" मग ? आपण शेतकरी म्हणजे तपस्वीच ! कष्टाचं तप आचरून शेतकरी अजब किमया करतो. मातीचं सोनं बनवतो. धुळींतून माणिकमोत्यांच्या राशी उभारतो. अग, आम्ही शेतकरी म्हणजे जगाचे राजे ! आम्हीच साऱ्या जगाला पोशीत असतों. विश्वाचं वैभव आमच्या पायांशीं लोळण घेत असतं ! "

बोलतां बोलतांच सांवतानें भजन सुरू केलें. देहभान विसरून तो भजनांत तल्लीन झाला. नागू झोपली होती. सांवतानें भजन सुरू करतांच ती उठली नि त्याला गोड गळ्यानें साथ करूं लागली.

विश्वाचें हें अमुचें वैभव गाजे
आम्ही दुनियेचे राजे !
निळया नभीं रत्नांच्या तळपति ज्योती
भूमींतहि अगणित हीं माणिक-मोतीं
दशदिशांत विश्वम्भर-रूपच साजे !
आम्ही दुनियेचे राजे !
धूळींतुनि सोन्याच्या राशीच उभारूं ;
किमया करूं !
तप अवघें कष्टांचें संतोषें आचरूं
आनंदें जग भारूं ; सुखशान्ति वरूं
देवाचें छत्र शिरीं नित्य विराजे
आम्ही दुनियेचे राजे !

सांवताचें भजन रंगांत आलें. तें ऐकायला खोपटाबाहेर गांवकऱ्यांची हळूहळू गर्दी जमली. सारेजण त्या भजनांत रंगून गुंगून गेले. एक म्हातारा उद्गारला, "वा रे वा सांवताबा ! खरा साधु ... सत्पुरुष ! डुईवर आभाळ कोसळलं तरीबी गडी आपल्याच रंगांत रंगतुया !" लगेच दुसरा एक जवान बोलला, "गड्यांनो ! काईबी हूदे ... पर सांवताला मदत करायचीच. त्यानं आमच्या बायकापोरांस्नी दवापानी करून पटकीच्या आजारांतन वांचवलंय् ... आम्हांला जीवदान दिलंय् ! त्येचं रीण फेडायचंच."

आणि मग दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते सारेजण सांवताकडे आले. सांवता नेटानें विहीर खणत होता. जनाई दगडमाती वाहात होती. नागूचेही चिमणे हात होतेच मदतीला. त्या लोकांना पाहून जनाईनें विचारलें, "आमची गंमत बगाया आलासा व्हय ? "

"नव्ह...नव्ह, जनाबाई ! तुमास्नी मदत कराया आलोंय् आमी..."

" पर आत्तांपातुर पाटलाच्या भ्यानं त्वांड दडवून बसलीसा... आमास्नी इसरलासा ? "

" इसरूं कसं ? कामालाच आलोंय् आमी. " एक तगडा गडी बोलला, " सांवताबा ! तुमी आतां जरा बसा ... इसावा घ्या. कालपास्नं एकठ्यानं खणताया ... आतां आमी खणतों ... " पण सांवतानें लगेच हात जोडून सांगितलें,

" नको-नको ! हात जोडतों तुम्हांला. माझ्यापायीं तुम्ही आणखी आपल्यावर गांवाचा कोप ओढवून घेऊं नका, बाबांनो ! "

" गांवाचा कोप म्हंजी काई देवाचा कोप नव्ह ! चला र ! लागा कामाला. "

" नको-नको. तुम्ही आपल्या घरीं जा. इथें उभेसुद्धां राहूं नका ... तुम्हांला माझी शपथ आहे, देवाची शपथ आहे."

" आयत मदतीला धावलत, त्येस्नी नग म्हंतायसा ? " जनाई म्हणाली.

" मग काय ? ह्यांनाही आपल्याबरोबर संकटांच्या खाईंत लोटायचं ? बिचाऱ्या शिवबाची दशा पाहिलीस ना ? तो आपणांला मदत करतो म्हणून ... "

" त्या सावकारणीनं आकसानं त्येला देन्याचा तगादा लावून त्येची जमीन, घरदार... समदं घशांत घातलं ... काशीबालाबी चाकरीवरनं हाकललं ! अन्नाला महाग केलं त्या सटवीनं ! "

" होय ना ! मग उद्यां ह्यांच्यावरही असाच प्रसंग आणायचे ते ग्रामकंटक."

" गांवच उलटलाय आपल्यावर." जनाईनें डोळ्यांना पदर लावला.

" उलटूं दे. चिंता नाहीं. तूं कां उगीच वाईट वाटून घेतेस ? साऱ्या गांवानें पाठ फिरविली, तरी तो पांडुरंग आपला पाठीराखा आहे ! "

सांवतानें मदत घेण्याचें नाकारल्यामुळें त्याच्या मदतीसाठीं आलेलीं माणसें नाइलाजानें परत गेलीं.

# विठोबाला घाम सुटला

दुसऱ्याच दिवशीं अरणगांवची कार्तिकी वारी सांवताच्या मळ्यावरून पंढरपूरला जाऊं लागली होती. पालखीचा सोहळा, भजनाचा भपका नेहमींप्रमाणेंच होता. धन्याला भेट द्यायला म्हणून ओसाड मळ्यांतलीं मिळालीं तसलीं फळें एका फडक्यांत बांधून नागू आपल्या शेताच्या बांधावर उभी होती.

दरसालच्या रिवाजाप्रमाणें गांवाच्या वेशीवर सांवताच्या मळ्यासमोर पालखी थांबली. रावजीशास्त्री म्हणाले, "गजराताई! आतां सालाबाद-प्रमाणें तुमची 'गौळण' झाली पाहिजे ..."

"पण कशी? ठसक्यांत झाली पाहिजे. ... नि एकटीनें नव्हे, तर जोडीनें झाली पाहिजे." एक तरुण वारकरीण बोलली.

"जोडीनें म्हणजे?"

"गजराताई राधादेवी नि गोपाळदादा गोपाळकृष्ण!"

"वाः! वाः! तर मग फारच मजा येईल." एका वृद्ध वारकऱ्यानें खुषींत येऊन म्हटलें, "हां! गजराताई! गोपाळदादा! करा सुरुवात! तुम्हां राधाकृष्णाच्या भक्तिगीतानें आमचे कान पवित्र होऊं देत."

गजरानें गाणें सुरू केलें. गोपाळदादानें तिला साथ दिली.

गजरा : सोड सोड ना कान्हा!
मला जाऊं दे रे घरीं!
गोपाळ : यमुनातीरीं मौज भारी
चल ना बघुं या साजरी!
गजरा : कशि बाई, अवखळ सारी
तुझी लीला, चातुरी!
गोपाळ : गोकुळची तूं गवळण भोळी
गजरा : भुलविशि कां रे वनमाळी?
सख्या, बोल ना, मनमोहना!
परनारी मी राया!
गोपाळ : बावरशी कां वांया?
गजरा : तूं आत्मा, मी काया!
गोपाळ : मी ब्रह्मच, तूं माया!
गजरा : कल्पतरू तूं, मी छाया!
गोपाळ : कुंजवनीं चल सेवाया
भक्तीची माधुरी!
वारकरी : सोड, सोड ना कान्हा!
मला जाऊं दे रे घरीं।

अशा रीतीनें भजनाच्या नांवाखालीं गजराची एक फक्कड, ढंगदार, रंगदार 'गौळण' हावभावासकट झाली. साऱ्या वारकऱ्यांनींही तिला साथ दिली. भक्तिरसाबरोबरच शृंगाररसाचाही महापूर लोटला!

तितक्यांत तिकडे सांवताच्या विहीर खणण्याकडे रावजीशास्त्र्याचें सहज लक्ष गेलें. तो गजराला म्हणाला, " अहो! तो बघा कर्मयोगी महापुरुष! पुन्हा उद्योगाला लागलाय्." नि मग नागूला गजरानें विचारलें,

" काय ग पोरी, काय चाललंय् तुझ्या बापाचं? नवी विहीर खणतोय् वाटतं?"

नागूनें ' व्हय-व्हय ' म्हणतांच गोपाळदादा हसून म्हणाला, " भगीरथाचा नवा अवतारच हा!"

" होय तर! त्या भगीरथानें स्वर्गांतली गंगा खालीं आणली नि हा भगीरथ आतां पाताळांतली गंगा वर आणणार आहे!" रावजीशास्त्र्याच्या ह्या बोलण्यावर सारे वारकरी स्त्रीपुरुष फिदीफिदी हसले.

नागू भीतभीतच गजराच्या जवळ जाऊन म्हणाली, " ह्यें एवढं आमच्या मळ्याच्या मालकाला ... पंढरीच्या इट्टलाला द्यायचं हाय."

" पण काय, आहे काय हें?"

" आमच्याच मळ्यांतलं..."

" दगड-धोंडे... माती नि ढेकळं! दुसरं आतां उरलंय् काय मळ्यांत?" असें म्हणतच गोपाळदादानें नागूच्या हातांतलें बोचकें हिसकवून घेतलें नि तें सोडून बघून " शीः शीः शीः! सडकीं गाजरं ... किडकीं रताळीं ... कुजकीं केळीं ... नासकीं फळं!" असें ओरडत लांब उधळून दिलें!

" अवो, अवो, ह्यें काय केलंत?" बिचारी नागू रडकुंडीला आली. धुळींत चहुंकडे पडलेलीं फळें तिनें गोळा करून पुन्हा फडक्यांत बांधलीं नि म्हटलें, " असं ह्यें फेकूं नका हो! गजराताई, ह्यें एवढं न्या हो! नि त्या इट्टलाला म्हनावं, मळ्याची लई नासाडी झालीया... येकदा येऊन जा..." बोलत बोलतच नागूनें बोचकें गजरापुढें ठेवलें. गजरानें तें उडवीत म्हटलें, " चल, हो तिकडे! लोचट, लुब्री कुठली!

बापाप्रमाणेंच पोरीचंही टाळकं फिरलेलं दिसतंयू ! हे-हे घाणेरडे जिन्नस देवाला देतेस ? ” गजरा तें बोचकें पायांखालीं तुडवूं लागली.

“ नग-नग ... तुडवूं नगा वो ! तुमचे पाय धरतें मी ... ” डोळ्यांत पाणी आणून नागूनें गजराच्या पायांना मिठी मारली. गजरानें चिडून थाडकन् तिच्या थोबाडींत मारली नि तिला दूर ढकलून दिलें.

“ अयाई ग ! बाबा ! ... बाबा ! ” नागू कळवळून ओरडली. सांवता नि जनाई धावून आलीं. नागू रडत रडत सांगूं लागली, “ आई ! बाबा ! ह्यांनीं माझीं फळं पायांखालीं तुडवलीं ! ”

जनाईनें नागूला “ उगी-उगी, माझी बाळ ! ” म्हणून गप्प केलें. सांवता गजराला म्हणाला, “ बरं नाहीं केलंत हें. वारकरी तुम्ही ! पंढरीला चाललांत पांडुरंगाच्या दर्शनाला ! ... नि पांडुरंगाला लाथाडून ? ”

“ पांडुरंगाला लाथाडून ? म्हणजे ही फाजील पोरटी तुझा पांडुरंग वाटतं ? ” गोपाळदादाच्या ह्या बोलण्यावर सांवता म्हणाला,

“ लहान मूल म्हणजे देवाची मूर्ति ! निष्पाप बालमनाची भक्तिभेट तुम्हीं पायांखालीं तुडवलीत ! ... तुम्हांला पांडुरंगाचं दर्शन होणार नाहीं ! ”

“ आम्हांला पांडुरंगाचं दर्शन होणार नाहीं ? तें रे कां बाबा ? ” गजरानें चमकून विचारलें.

“ लहान मुलांत ज्याला देव दिसत नाहीं, त्याला तो जगांत कुठेंच दिसत नाहीं ! ” सांवता शांतपणें उत्तरला. सारे ढोंगी टाळकुटे दांत काढून हसूं लागले. गजरा खंवचटपणें हसून मोठ्यांदा ओरडली, “ ऐका हो ऐका ! ह्या महात्म्याचा शाप ऐका ! तुम्हांला पांडुरंग दिसणार नाहीं ! ” वारकरी मंडळींत मोठा हास्यस्फोट झाला. गोपाळदादानें शेरा मारला, “ शाप देतोय् महामूर्ख ! मोठा धर्मात्मा, पुण्यात्माच कीं नाहीं ! ”

“ पांडुरंग ! पांडुरंग ! ” असें भजन करीत वारकऱ्यांची दिंडी चालूं लागली. तेवढ्यांत काशीबा तेथें आला नि वेडावीत म्हणाला, “ पँडुरंग !

पँडुरंग! ... डोळयावर चढलीया धुंदी अन् चाललत पांडुरंगाच्या दरसनाला! लबाड, लुच्चे, लफंगे लेकाचे!" नि मग रडणाऱ्या नागूला कुरवाळीत तो बोलला, "उगी, रडूं नगस. मी नेऊन देतों इट्टलाला ही तुजी वानगी!"

"खरंच?" नागूला ब्रह्मानंद झाला.

"खरं म्हणजे? हा निघालोंच बघ."

"मालकांना सांगावाबी सांग..."

"हो हो. सांगतों कीं ... मळ्याची लई नासाडी झालीया. ... येकदा येऊन जा बिगिबिगी!"

"त्येस्नी घेऊनच ये तुज्यासंगं."

"घेऊनच यतों."

"मी वाट बगतें हं!"

"जरूर वाट बघ." बोलतां बोलतां बोचकें घेऊन काशीबा चालूं लागला.

सांवतानें विचारलें, "म्हणजे? खरंच निघालास तूं पंढरपूरला?"

"मग? नागूची ही भक्तिभेट कोण पोंचवणार? ... तिचा सांगावा इट्टलाला कोन सांगनार? ... येऊन जा बिगिबिगी ..." असें म्हणून नागूकडे हसत पाहात पाहात काशीबा पंढरीच्या वाटेला लागला.

सांवताचें विहीर खणण्याचें काम पूर्ववत् चालू झालें. इकडे त्याच्या अंगांतून घाम निथळतांना पाहून तिकडे पंढरपुरांत पांडुरंगाच्याही दयेला जणुं पाझर फुटला!

पंढरपुरांत विठोबाच्याही मूर्तीला घाम सुटला! जेवढा पुसून टाकावा, तेवढा जास्तच! इकडे जनाई सांवताचा घाम पुशीत होती नि त्याच वेळीं तिकडे पुजारीमंडळी विठोबाचा घाम पुशीत होती! सर्वत्र हाकाटी झाली ... विठोबाला घाम सुटला! विठोबाला घाम सुटला! कलियुगांतला

चमत्कारच हा! पण हें सुचिन्ह, कीं दुश्चिन्ह? लोकांत चर्चा-चिकित्सा सुरू झाली. कोणींही कधींही कोठेंही ऐकलें नव्हतें, पाहिलें तर नव्हतेंच. तें आतां प्रत्यक्षच लोकांना पाहायला मिळालें... गाभाऱ्यांत घामानें निथळणारी श्रीविठ्ठलाची सांवळी मूर्ति!

चार दिवस झाले. इकडे सांवता विहीर खणतांना घामानें निथळतो आहे नि तिकडे त्याचा कैवारी तो पांडुरंगही घामानें डबडबतो आहे! चमत्कार बघायला लोकांची ही गर्दी सभामंडपांत! गांवोगांवचे वारकरी गोळा झालेले. पण त्यांनाही पांडुरंगाचें दर्शन मुष्कील झालें.

त्या गर्दींतूनच वाट काढीत काशीबा कसाबसा गाभाऱ्याकडे जाऊं लागला. पुजाऱ्यानें त्याला अडविलें. "कोण रे तूं? थेट देवाच्या गाभाऱ्यांत घुसतोस?"

"मी काशीबा!... अरणगांवचा! हें एवढं देवाला द्यायचं हाय." काशीबानें बोचकें सोडून दाखविलें. पुजारी भडकला. "हीं कुसकीं-नासकीं फळं देवाला?... माणसाची जात किती स्वार्थी नि लबाड आहे, बघा! सडकं किडकं देवाला द्यायचं नि आपण मात्र चांगलं चांगलं खायचं! चल, चल, आधीं बाहेर हो!" काशीबाला दंडाला धरून पुजाऱ्यानें बाहेर काढलें नि "आणा, आणा... पंचामृताच्या घागरी आणा!" असें ओरडत पुजारी देवाच्या पंचामृतस्नानाच्या तयारीला लागला. तेवढ्यांत गाभाऱ्यांत कोणीही नाहीं असें पाहून काशीबा घुसला आणि देवासमोर जाऊन उभा राहिला नि हात जोडून म्हणाला,

२०५९

"देवा! विठ्ठला! सांवता माळ्याच्या पोरीनं... नागूनं हें तुला दिलंय्. अन् योक सांगावाबी तिनं सांगितलाय्. समद्या शेतमळ्याची नासाडी झालीया. तवा येकदां येऊन जा. येशील ना? पांडुरंगा! तुज्या सांवता माळ्यावर तकड लई कठीन परसंग गुदरलाय् अन् तूं मातुर हाकड असा कमरेवर हात ठेवून गुमान गंमत बगत उभा राह्यलास व्हय?

अर, काय म्हनावं तुला ? अर, गरीबाची दया येत न्हाई, त्यो देव कसला ? आतां लई अंत बगूं नगस."

तितक्यांत पुजारी, सेवेकरी गाभाऱ्यांत आले. "अरेच्चा ! हा वेडा पुन्हा घुसलाच आंत...देवापुढें नासकीं फळं ठेवतोय्." असें म्हणत कांशीबाला धक्के मारून गाभाऱ्यांतून ते बाहेर आणूं लागले.

आणि तिकडे गाभाऱ्यांत ?...प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाची बालमूर्ति साकार स्वरूपांत प्रकट झाली नि आपल्या बालभक्तानें ... नागूनें दिलेलीं गाजरें आनंदानें नाचत मिटक्या मारीत खाऊं लागली !

तोंडानें देवाचें भजन करीत सांवताचें विहीर खणण्याचें काम चालूच होतें. गांवांतले लोक पाहायला येत होते. शिवबा, ठाणेदारासारखी सज्जन मंडळी सांवताचें कौतुक करीत होती, तर पाटील, गुरव, जानबा, अन्याबासारखे दुष्ट लोक त्याची टवाळी करून टर उडवीत होते.

"काय खुळा नाद लागलाय् बगा ह्या येड्याला ! एकल्यानं कंदी कुनी हीर खनलीया ?"

"फुकट घाम गाळतोय् !...ह्याला येडच लागलंय्." असे निरनिराळे उद्गार काढून ते हेटाळणीनें हसत होते.

टवाळखोरांच्या निंदा-नालस्तीला भीक न घालतां सांवता आपल्या कामांत गढून जाऊन देवाला जीवेंभावें आळवीत होता....

कांहीं नेणे इष्टानिष्ट । देवा, तुझ्यासाठीं कष्ट
प्रयत्नांना पाठबळ । अन्तरीचें भावबळ
दृढ भक्तीचें हें तत्त्व । किती पाहशील सत्त्व ?

तिकडे पंढरपुरांत विठ्ठलाच्या घामाच्या चमत्काराप्रमाणेंच दुसराही एक चमत्कार घडून आला. विठोबाच्या मूर्तीला स्नान घालतांना पंचामृताच्या घागरीच्या घागरी ओतल्या, तरी गोमुखांतून तीर्थ बाहेर पडेना !

सारें पाणी जागच्या जागीं जिरूं लागलें! भक्तजनांना तीर्थ मिळेना. त्यांच्या तोंडून उद्गार निघाले, "अरेरे! पांडुरंगाच्या कृपेचाच झरा आटला!"

पण तो खरोखरीच आटला होता का? छे–छे! आज तो देवाच्या कृपामृताचा झरा सांवताच्या नव्या विहिरीकडे वळला होता!

सांवता खणत होता. पाटील ठाणेदाराला म्हणाला, "बगा, ठानेदार! समदं खडकाळ माळरान हें ... अन् ह्या हतं पानी कसं गवसनार?"

"कठीण खडकांतूनच पाण्याचे झरे झुळझुळतात!" ठाणेदारान उत्तर दिलें.

"पर पाताळाचा असा अंत बगून का पानी मिळनार?" जानबा बोलला. शिवबानें त्याला उत्तर दिलें,

"पाताळाचा नव्हं ... पांडुरंगाच्या बिरुदाचाच अंत बगतुया सांवताबा!"

तितक्यांत खणतां खणतां सांवता थकला नि धाडकन् मूर्च्छित पडला! ... नि त्याच क्षणाला खडकांतून पाण्याचे झरे कारंजासारखे उंच उंच वरती उसळले!

"अवो! बगा–बगा! उठा–उठा! किती झर फुटल! एक–दोन–तीन–चार!" जनाईचा आनंद गगनांत मावेना. सांवतालाही कृतार्थ झाल्यासारखें वाटलें.

सर्वांनाच तो ईश्वरी चमत्कार वाटला. नि एका क्षणांत यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें झालें.

"सांवता! सांवता! साऱ्या गांवानें तुला सतावलं, पण प्रत्यक्ष पांडुरंग तुझा कैवारी आहे!" असें म्हणून ठाणेदारानें सांवताला कडकडून मिठीच मारली.

"देवाची करणी! दहा हातांवर पाणी!" जानबा–अन्याबांनीं तर सांवतापुढें सपशेल दंडवतच घातला. इतकेंच काय, पण पाटलानेंही

"चुकलों आमी ! पांडुरंग तुजा पाठीराखा, सखा हाय ! " असें म्हणत सांवताच्या पायांवर डोकें ठेवलें !

सारा गांव सांवताच्या भजनीं लागला. त्याच्या मदतीसाठीं गांवकऱ्यांचे हजार हात आपखुषीनें पुढें आले.

विहिरीला पाणी लागल्यावर सांवतानें शेताची नांगरणी सुरू केली. इतर शेतकरीही आपले बैल घेऊन सांवताच्या शेतांत नांगरायला आले. शेत-मळयाच्या मशागतीचें काम नव्यानें सुरू करतांना सांवता देवाचें भजन म्हणूं लागला. सर्वजण त्याला साथ देऊं लागले...

नामाचिये बळें न भिऊं सर्वथा
कळीकाळाच्या माथां सोटे मारूं !
वैकुण्ठींचा देव आणूं या कीर्तनीं
विठ्ठल गाऊनी नाचूं रंगीं !
सुखाचा सोहळा, करूनी दिवाळी
प्रेमें वनमाळी चित्तीं धरूं !
सांवता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा
तेणें मुक्तिद्वारा वोळंगती !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि. ........
क्रमांक ........ नोंद दि. २८·१२·६८

# देव देवळांतून चालले !

तिकडे पंढरपुरांत तर अघटितच घडलें. अरणगांवच्या वारकऱ्यांना देवाची मूर्ति दिसेना. त्यांनीं नामदेवाला सांगितलें, " नामदेव महाराज ! मोठ्ठा चमत्कार घडलाय् ! "

" सध्यां सगळे चमत्कारच घडताहेत." नामदेव म्हणाले, " विठोबाच्या मूर्तीला घाम सुटतोय् ! ... तिच्यावर ओतलेलं पाणी मधल्यामध्येंच कुठें जिरून जातंय् ... तीर्थकुंडांतून बाहेर पडत नाहीं ! "

" नि आतां तर आम्हांला मूर्तिच दिसत नाहीं ! " रावजीशास्त्री बोलला, " आपल्या कीर्तनाच्या प्रसंगीं स्वतः पांडुरंग आपल्या मागें अदृश्य रूपानें टाळ वाजवीत उभे असतात म्हणे ! पण तें खरं असलं तरी पांडुरंगाची मूर्ति तर जाग्यावर गाभाऱ्यांत दिसायला हवी ना ? "

" म्हणजे ? म्हणतां काय तुम्ही ? तुम्हांला पांडुरंगाची मूर्ति दिसत नाहीं ? सर्वांना दिसते नि तुम्हांलाच कशी दिसत नाहीं ? " नामदेवांनीं आश्चर्यानें विचारलें. गोपाळदादा सांगूं लागला,

" आम्हां अरणगांवच्या वारकऱ्यांना त्या सांवता माळयाचा शाप बाधलेला दिसतोयू ! "

" होय, महाराज ! त्याच मेल्याची बत्तीशी फळफळली. " गजरा बोलली, " तुम्हांला देव दिसणार नाहीं, अस्सं म्हणाला होता सांवत्या नि अगदीं तस्सं झालं ग बाई ! काय तरी मेली एकेकाची वाचा अमंगळ असते ! "

तितक्यांत सभामंडपांत खांबाशीं टेकून बसलेला काशीबा चटकन् उठून गरजला, " सांवता माळ्याची वाचा अमंगळ नाहीं... तुमची करणी अमंगळ आहे. करणी तशीं फळं ! "

" तूं आहेसच का इथेंही आमच्या राशीला ? भलतंच बरळूं नकोस. " गजरानें दरडावलें. पण लगेच अरणगांवच्या वारकऱ्यांपैकींच एक वृद्ध वारकरी म्हणाला, " काशीबा खरं तेंच बोलतोयू. सांवतासारख्या साधु-सज्जनाची नाहक निंदा-नालस्ती, छळणूक करणारे तुम्ही ढोंगी भामटे ! "

" तुम्हांला देवाची मूर्ति दिसणार कशी ? सज्जनाचा कोप म्हणजे देवाचा कोप ! " रावजीशास्त्री कडाडला.

" पण तुम्हीही आमच्याच माळेंतले मणि आहांत ना ? " गजरानें तोऱ्यांत विचारलें. त्यावर रावजी लगेच बोलला,

" हो, पण आतां आमचे डोळे उघडले. तूं नि हा तुझा लाडका गोपाळदादा ! तुम्ही दोघं ह्या अनर्थाला कारण आहांत ! तुमचं पाप आम्हांला नडतंयू... आधीं बाहेर व्हा देवळाच्या ! "

" तुमच्या सांवलीचादिखील विटाळ नको, " एक बाई रागानें लाल होऊन गजराला म्हणाली, " खालमुंडी नि पाताळ धुंडी ! मोठी आलीयू पुण्याईची हंडी ! वाण गायीचा नि करणी कसाबाची ! चालती हो इथून ! "

" वारकऱ्यांच्या तोंडाला काळिमा लावणारे तुम्ही !... तुम्हांला अशी गचांडी देऊनच बाहेर हाकलायला हवं ... " रावजी गोपाळदादाच्या

अंगावर धावून गेला. नामदेव त्याला अडवून म्हणाले, " थांबा ! थांबा ! असे आपसांत भांडूं नका ... पण हा सांवता माळी आहे तरी कोण ? "

" आहे असाच एक आमच्या गांवांतला अडाणी कुणबट ! मोठ्ठा लबाड, ढोंगी, शिष्ट ! तोंडानें ' विठ्ठल-विठ्ठल ' करतो, पण कधीं त्याची मूर्ति पुजत नाहीं, कीं कधीं पंढरीच्या वारीला येत नाहीं ... इथून अवघ्या सहा कोसांवर राहून ! "

गोपाळदादाच्या ह्या बोलण्यावर रावजी लगेच उसळला, " नामदेव-महाराज ! खोटं बोलतोय् हा ढोंगी माणूस. सांवताबा खरा देवभक्त आहे ... परोपकारी महात्मा आहे ! "

" तें राहूं दे ... पण कसंही करून आम्हांला पांडुरंगाचं दर्शन घडवा हो ! " सर्वच वारकऱ्यांनीं काकुळतीनें नामदेवांना विनविलें.

निश्चयी स्वरांत नामदेव म्हणाले, " चिंता करूं नका. मी तुम्हांला देवाचं दर्शन घडवतों. तुम्हांला पांडुरंगाची मूर्ति दिसूं लागेपर्यंत मी हा अस्सा इथें भजन करीत उभा राहाणार ! ... देवादारीं धरणं धरणार ! "

आणि खरोखरीच ' विठ्ठल विठ्ठल ! जय हरि विठ्ठल ! ' असा विठ्ठलनामाचा घोष करीत नामदेव निर्धारानें सभामंडपांत दिवसरात्र उभेच होते. पण तरीही अरणगांवच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचें दर्शन झालें नाहीं. अखेर, रावजीशास्त्री हात जोडून म्हणाला, " नामदेवमहाराज ! पुरे आतां. आमच्यासाठीं किती कष्ट घेणार ? आम्हीच पापी आहोंत ! आम्हांला विठ्ठलमूर्ति दिसणार नाहीं ... सांवत्याचाच शब्द खरा झाला ! "

" सांवत्याचा शब्द खरा झाला, " ह्या उद्गारांनीं नामदेवांचा अहंकार जागा झाला. पांडुरंगाला उद्देशून ते बोलले, " सांवत्याचा शब्द खरा झाला. पण पांडुरंगा ! ह्या वारकऱ्यांना मीं शब्द दिलाय्, त्याचं काय ? माझा शब्द तूं खोटा पाडणार का ? पंढरीनाथा ! पांडुरंगा ! आजवर कैकदा तूं ह्या नाम्याचे हट्ट पुरविले आहेस. आजचा हासुद्धा हट्ट तूं पुरवलाच

पाहिजेस. अरणगांवच्या वारकऱ्यांना तुझी मूर्ति दिसेपर्यंत मी हा अस्सा तुझ्या नांवानें टाहो फोडीत तुझ्यापुढें अहोरात्र उभा राहाणार ! ”

आणि पुन्हा त्यांचें ‘ विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठल ! ’ असें नामसंकीर्तन सुरू झालें.

इकडे पांडुरंग-दर्शनाचा असा हट्ट नामदेवांनीं धरला, :तर तिकडे नागूनेंही तोच हट्ट धरला होता. काशीबाबरोबर मळ्याचा धनी ‘ इट्टल ’ येणार म्हणून ती हरखली होती. रोज ताज्या सुवासिक फुलांची नि तुळशीची माळ गुंफून ती विठ्ठलाची वाट बघत बसायची. माळ सुकून जायची, पण विठ्ठलाचा नि काशीबाचा पत्ता नसायचा !

अखेर, एकदाचा उगवला काशीबा. पण तो पंढरपुराहून एकटाच परत आलेला पाहून नागूनें त्याला विचारलें, “ धनी कुटं हैत ? तूं त्येस्नी संगंच आननार व्हतास ना ? ”

“ व्हय ग, आननार व्हतों ! त्ये येनारच व्हते माज्यासंगं ! पर लई पाव्हनं आल्याती त्येंच्याकडे. तवा त्ये म्हनाले, ‘ काशीबा, तूं म्होरं हो ! मी आलोंच तुझ्या मागोमाग ! ’ ”

“ मग आतां येतील नव्ह ? ”

“ येतील म्हंजे ? येनारच ! यायलाच हवं त्येंनीं ... तसं बजावूनच आलोंय मी, ” असें म्हणून काशीबा खट्याळपणानें हसूं लागला. जनाई रागानें म्हणाली, “ काशीबा, तूंबी पोरासंगं पोर झालास व्हय ? कुठला र कोन मळ्याचा धनी येनार ? ”

“ पंढरीचा इट्टल येनार ! ” असें म्हणून काशीबा हसत हसत आपल्या घरीं गेला.

“ इट्टल येतु या. वाट बग. ”

“ वाटच बगतीया मी, ” माळ गुंफायची तयारी करीत नागू म्हणाली.

“ कवापास्नं खा–खा म्हटलं तर येडं आपल्याच तारंत ! चल, जेवून घे. ”

"मी न्हाई जेवनार ! मी जेवाया बसलें नि हाकड धनी आलं तर ? त्ये आल्यावरच जेवनार मी."

"बया ! बया ! प्वार कीं सोंग ?"

नागू जेवली नाहीं. हार गुंफीत बसली. तोंडानें तिचें विठ्ठलाचें गाणें चालूच होतें...

येड लावलं इट्टलानं
बाई, काय मी करूं ?
कवा दिसंल त्यो इट्टल डोळां
धीर तरी किति धरूं ?

जनाईनें पुन्हा तिला जेवायचा आग्रह करून, तो विठ्ठल येणार नाहीं, असें तिला सांगतांच नागू आनंदानें गात नाचत तिलाच बजावूं लागली...

त्यो येनार येनार येनार ग
अपुल्या मळयांत ग !
तुळशीफुलांचा ताजा हार
मी घालनार त्येच्या गळयांत ग !
कानांत सांगत्यें, येनार कोन त्यें
पुसूं नग तूं येड्यावानी !
मळयाचा धनी येनार ग
अपुल्या मळयांत न्हानार ग
त्येच्यासंगं मी खेळनार ग
गरगर गरगर फिरनार ग !

असें म्हणून आपल्याबरोबर नागूनें जनाईला गरगर फुगडी खेळायला लावलें !

तिकडे पंढरपुरांत विठ्ठलमंदिरांत नामदेवांचेंही विठ्ठलभजन अखंड उम्यानें चालूच होतें. मध्यरात्रींचा प्रहर टळला. नामदेवांकडे ज्ञानदेव

येऊन म्हणाले, "नामदेवा! काय मांडलंस हें? आज तीन दिवस झाले... अस्सा उभा आहेस!"

"अरणगांवच्या वारकऱ्यांना विठ्ठलमूर्ति दिसत नाहीं."

"नि ती त्यांना दाखवायचा तूं हट्ट धरला आहेस! पण वेड्या, ज्यांच्यासाठीं तूं हा असा अट्टाहास आरंभला आहेस, ते अरणगांवचे वारकरी तर तिकडे खुश्शाल घोरत पडले आहेत! नि तूं मात्र इकडे..."

"पण ज्ञानदेवा! हा आतां त्यांचा नव्हे, तर ह्या नामदेवाच्या तत्त्वाचा, सत्त्वाचा प्रश्न झाला आहे... अरे! पण हें काय?" नामदेव मध्येंच एकदम आश्चर्यानें उद्गारले, "देवाची मूर्ति आतां मलाही एकाएकीं दिसेनाशी झाली!"

तेवढ्यांत गाभाऱ्याच्या बाजूनें एक तेजोवलय चक्राकार गतीनें फिरत फिरत देवळाबाहेर निघून जातांना ज्ञानदेवांना दिसलें. ते म्हणाले, "नामदेवा! नामदेवा! ते पाहा! देव देवळांतून चालले!"

"देव चालले?... कुठें? कुठें?"

"अरणगांवला! सांवता माळ्याकडे! शंकाच नाहीं."

"अहो, पण तो तर म्हणे मुलुखाचा नास्तिक आहे. एकदादेखील कधीं पंढरीच्या वारीला...विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरपुरास आला नाहीं!"

"तो आला नाहीं, म्हणूनच स्वतः पांडुरंग त्याच्या भेटीला चालले आहेत! भगवंतानेंच भक्ताकडे धाव घेतली!"

असें बोलत बोलतच ज्ञानदेव नि नामदेव मंदिराबाहेर पडून अरणगांवच्या वाटेनें चालूं लागले.

# मळा भक्तीचा फुलला !

श्रीविठ्ठलाला प्रत्यक्ष आपल्या मळ्यांत आणण्याचा विलक्षण हट्ट धरून नागू बिछान्यावर तळमळत होती. गेले तीन दिवस तिनें पोटांत अन्नाचा कण, कीं पाण्याचा थेंब घेतला नव्हता. सांवताचा मळा आतां पुन्हा पहिल्यासारखा बहरूं लागला होता. पण हें एक नवीनच चमत्कारिक संकट त्याच्यावर कोसळलें होतें.

नागूच्या उश्या-पायथ्याला सांवता, जनाई, गिरिजा, शिवबा, काशीबा, वगैरे मंडळी चिंतातुर, खिन्न मुद्रेनें बसली होती. नागू डोळे मिटून अंथरुणावर निपचित पडली होती.

" असं जगायेगळं येड कंदी पाहिलं नव्हतं, बाई ! " गिरिजा म्हणाली.

" कोन, कुठला देव आतां कसा येनार, देवालाच ठावं ! "

" न यायला काय झालं ? " सांवता म्हणाला, " ध्रुवबाळाच्या हाकेला नारायण धावून आला नाहीं ?... भक्त प्रल्हादासाठीं तर देवानें नवा अवतार धारण केला ! कुणीं सांगावं ?... माझ्या नागूसाठींही पंढरीचा विठ्ठल धाव घेईल ! "

"तुमी-तुमीच असं येड भरवलंसा पोरीच्या डोक्यांत." जनाई वैतागानें बोलली, "अन् आतां ह्यो जिवावरला परसंग आलाया."

"पांडुरंगाची लीला अगाध आहे!"

"पांडुरंगाची नव्ह, तर तुमचीच लीला अशी भंवतीया... पोरीला कांहींबाहीं सांगितलंसा... आतां दावा तिला इट्टल! अन् काशीबा! तूं बी पोरीला चिथावलंस... म्हनं इट्टल येनार!"

"अग आई! खरंच येनार ग इट्टल!" नागू क्षीण स्वरांत बोलली, "येतों म्हनालाय् तर येनारच बग. व्हय ना काशीबा?"

नागूचा केविलवाणा प्रश्न ऐकून काशीबाला एकदम भडभडूनच आलें. आपण सहज नागूची गंमत करायला गेलों, पण ती गंमत अशी तिच्या जिवावर बेतायचा प्रसंग येईल, ही कल्पनाच शिवली नाहीं त्या बिचाऱ्याच्या भाबड्या मनाला. डोळे पुशीत कांहींच न बोलतां तो तेथून निघून गेला.

नागूनें सांवताला विचारलें, "बाबा, खरंच येईल ना त्यो?"

"अग, इथेंच आहे तो. बघावं तिथें आहेच तो. तो देव आहे!"

"मला ठावं हाय. त्येला चार हात हैत. पर देव झाला म्हून त्येला काय हाकड यायला येत न्हाई?"

सांवता निरुत्तर झाला. नागूच्या बालमनाची समजूत कशी घालावी, तेंच त्याला सुचेना. तो डोळे मिटून पुन्हा सुन्न होऊन बसला. तितक्यांत नागूनें डोळे फिरविल्यासारखें केलें. जनाई घाबरली... सांवताला म्हणाली,

"अवो-अवो! हाकड पोरीच्या डोळ्यांत परान घोटाळतोया आन् तुमी तकड डोळे मिटून गुमान काय बसलासा?"

"अग, मग काय करूं मी तरी? पांडुरंगा! काय रे हा विचित्र प्रसंग आणलास माझ्यावर? माझ्या भक्तीची कसोटीच बघायची होती, तर दुसरा कोणताच मार्ग तुला सुचला नाहीं का? ह्या माझ्या एकुलत्या एक लाडक्या लेकीचे प्राण पणाला लावून तूं माझं सत्त्व बघतोस काय?

पांडुरंगा ! पांडुरंगा !" असा आर्त टाहो फोडून सांवतानें पुन्हा डोळे मिटले. त्याच वेळेला पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरांतून निघालेलें तें तेजोवलय सांवताच्या हृदयांत शिरून अदृश्य झालें !

आणि त्याच क्षणाला नागू एकदम दचकून ओरडत उठली ... "इट्टल आल ! मळ्याचं धनी आल ! आई ! . . .बाबा ! माजीं फुलं . . . माजा हार. . ."

सर्वजण घाबरून गेले. पोरीला वात झालाय् असें समजून जनाई सांवताला म्हणाली, " अवो, उठा-उठा ! वैद्याला तरी बोलावून आणा ! "

तितक्यांत फुलाजीराव सावकार, ठाणेदार, पाटील, जानबा, अन्याबा, काशीबा, वगैरे मंडळी सांवताला हाका मारीत घाईघाईनें तेथें आली. ठाणेदार म्हणाला,

" सांवताबा ! सांवताबा ! आपल्या अरणगांवाचं भाग्य थोर आहे ! ज्ञानदेवमहाराज आले ! नामदेवमहाराजही आले ! . . . तुझ्याकडेच आलेत ते."

सांवता लगबगीनें बाहेर आला. अंगणांत ज्ञानदेव-नामदेव उभे होते. सांवता धावत त्यांच्याकडे गेला नि हर्षभरानें त्यांना गाढ आलिंगन देऊन उद्गारला, " आले घरां संतजन । झालें सफळ जीवन ॥ नामदेवा ! ज्ञानदेवा ! अगदीं वेळेवर आलांत. पांडुरंगानेंच तुम्हांला ह्या वेळीं धाडून दिलं ... माझ्या पोरीचे प्राण वांचवायला !"

"पोरीचे प्राण ? म्हणजे ?" नामदेवांनीं घाबरून विचारलें.

"काय सांगूं, नामदेवा ? आज तीन दिवस झाले. माझी पोर विठ्ठलाच्या भेटीसाठीं हट्ट धरून बसली आहे. अन्नपाणी वर्ज्य करून, डोळ्यांत प्राण आणून विठ्ठलाची वाट पाहाते आहे ! विठ्ठलाचा ध्यास घेऊन मरणाच्या पंथाला लागली आहे !"

"विठ्ठलाचा ध्यास ? एवढ्या बालवयांत ? धन्य ! धन्य !!" ज्ञानदेव उद्गारले.

ज्ञानदेव-नामदेवांना घेउन सांवता घरांत गेला. नागूची ती प्राणांतिक अवस्था पाहून त्या संतश्रेष्ठांना वाईट वाटलें.

" नामदेवमहाराज ! देव म्हनं तुमासंगं बोलतो. तुमचे समदे लाड पुरवतो. तुमीच आतां माज्या लेकराचा हट्ट पुरवा. पोरीला इट्टल दावा. तुमच्या पायांवर पोरीला घातलीया." जनाई नामदेवांचे पाय धरूं लागली, तोंच नामदेवांनीं तिला नमस्कार करून म्हटलें, " मातोश्री ! आज ह्या नाम्याचा अहंकार पांडुरंगानें पुरता नष्ट केला. मलाच विठ्ठल दिसेनासा झाला, म्हणून त्याला शोधत शोधत मी इकडे आलों आहें. मी तुमच्या मुलीला विठ्ठल कसा बरं दाखवूं शकणार ? " आणि मग पांडुरंगाला उद्देशून नामदेव म्हणाले, " विठ्ठला ! पांडुरंगा ! माझ्यासाठीं नव्हे, पण ह्या निरागस, निष्पाप, चिमण्या बालभक्तासाठीं तरी माझ्या हाकेला धावून ये ! दर्शन दे ! "

" आलं का वो इट्टल ? " नागूनें विचारलें.

" नाहीं बरं बाळ, आज ह्या नाम्याची पुण्याई पांगळी पडली ! "

" बाबा ! बाबा ! तुमी तरी बोलवा वो इट्टलाला ! " ... नागूचे हे करुण, केविलवाणे, काकुळतीचे उद्गार कानीं पडतांच सांवताच्या हृदयानें कळवळून हंबरडाच फोडला. " विठ्ठला ! विठ्ठला ! माझ्या पोरीला तुझी भेट कशी रे करवूं ?

विठ्ठला पाहिलें वस्तुमात्रीं जाण
धन्य तो निर्गुण निराकार !
विश्वांत खेळतें चैतन्य अमूप
तुझें तें स्वरूप, विश्वम्भरा
सगुण स्वरूपीं परंतु विठ्ठला !
आज कुठें तुला पाहूं डोळां ?
करुणासागरा ! दडलास कोठें ?
नाहींसच वाटे त्रिभुवनीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



पण तूं त्रिभुवनांत नसलास तरी माझ्या हृदयांत खास आहेस! हृदय फाडूनच मी आतां तुला खेचून बाहेर काढतों!" असें म्हणतच सांवतानें एकदम आवेगानें खुरपें खुपसून घेऊन आपलें काळीज फाडून टाकलें! तो गतप्राण होऊन धाडकन् खालीं कोसळला ...

...आणि त्याच क्षणाला त्याच्या हृदयांतून निघालेली श्रीपांडुरंगाची अंगुष्ठमात्र चतुर्भुज मूर्ति मोठी होत होत नागूसमोर साकार स्वरूपांत उभी राहिली ! पांडुरंगानें सांवताच्या मस्तकावर वरदहस्त ठेवतांच सांवता सजीव होऊन झोपेंतून अचानक जाग आल्याप्रमाणें उठून उभा राहिला. त्याला नि नागूला पांडुरंगानें आपल्या हृदयाशीं कवटाळलें. नागूनें सुकलेलाच हार पांडुरंगाच्या गळ्यांत घातला, पण तो त्याच्या गळ्यांत पडतांक्षणींच ताजा, टवटवीत झाला ! सांवता हात जोडून गहिंवरल्या स्वरांत म्हणाला,

" देवा ! तुमच्या दर्शनानें आज हा सांवता धन्य धन्य झाला ! देवा ! किती कष्ट घेतलेत हे माझ्यासाठीं ? माझ्या पोरीचा बालहट्ट पुरविण्यासाठीं तुम्ही सगुण स्वरूपांत धावून आलांत ! "

" पोर असो कीं थोर असो, भक्तजनांच्या उत्कट भक्तीसाठीं भगवंताला धावून यावंच लागतं ! " ज्ञानदेव म्हणाले.

" भक्ताच्या हाकेला धाव घेणं, हें ब्रीदच आहे भगवंताचं ! " नामदेव म्हणाले.

" खरं आहे." श्रीपांडुरंग म्हणाले, " शिवाय, ह्या नागूसारखा मूर्तिमंत भोळा भक्तिभाव आणि सांवतासारखा साक्षात् उज्ज्वल कर्मयोग, ह्यांमुळें बहरलेल्या भक्तीच्या मळ्यांत माझं वास्तव्य अखंड असतं ! "

सर्वांनीं श्रीविठ्ठलचरणीं मस्तकें टेकलीं. सगुण सांवळें श्रीविठ्ठलस्वरूप बघतां बघतां अदृश्य झालें !

आणि तें तेजोवलय मात्र त्या ठिकाणाहून सांवता माळ्याच्या मळ्याकडे भिरभिरत जातांना दिसूं लागलें !

क्षणार्धांत सांवताचा मळा दैवी तेजानें रसरसला ! आनंदानें बेभान झालेल्या सांवताच्या तोंडून उत्स्फूर्त बोल बाहेर पडले . . .

राजा पण्ढरीचा हरि माझा आला !
मळा भक्तीचा फुलला
अमृतानें न्हाला
नवतेजानें खुलला
ना तुलना भाग्याला !
राजा पण्ढरीचा हरि माझा आला !
मोरमुकुट शिरीं, कटीं पीताम्बर,
तुळशीच्या माळा गळां ;
भाळीं कस्तुरीचा टिळा,
वनमाळी नटला !
राजा पण्ढरीचा हरि माझा आला !

# शुक्ल – साहित्य

## नाटकें

सौभाग्यलक्ष्मी
सिंहाचा छावा
साध्वी मीराबाई
स्वर्गावर स्वारी
आम्ही एकशें पांच
सत्याग्रही
लोक-सिंहासन
जनता अमर आहे
चंद्रावर मधुचंद्र
सर्जेराव फरारी

## कुमारवाङ्मय

नाटक-नाटक १ ते ३ : नाट्यसंवाद
हा सूर्य, हा जयद्रथ : नाट्यसंवाद
परमेश्वरास पत्र : गोष्टी
मीठे अगूर : कविता
मंगला : गोष्ट
बंब्या : गोष्ट
नवलनगरची राजकन्या : नाटिका
जंगल्या भिल्ल : नाटिका
बनला बैरागी राजा : नाटिका
मातीचा पुतळा : नाटिका
झुणका-भाकर : नाटिका
वीर अभिमन्यु : नाटिका
जयद्रथ-वध ; नाटिका

## चित्रपट

भक्त ध्रुव
राजा श्रियाळ
अकरावा अवतार
देवयानी
नारद-नारदी
गोरा कुंभार
भक्तीचा मळा [ माली ]
गजाभाऊ
नृसिंहावतार
पंढरीचा पाटील
खेळ चालला नशिबाचा
नंदकिशोर
सुदाम्याचे पोहे
विठू माझा लेकुरवाळा
सती महानन्दा
हर हर गंगे !
जग हें असेंच
उगवूं नको, सूर्या !

## नाटिका-संग्रह

चार चांदण्या
शिकलेले शहाणे
रंग–तरंग
नाटक रंगवूं छान

## काव्य

कुमुदबान्धव
सुनीतिका
संगीतिका
रुपेरी रसधारा
जयजयवन्ती
कृष्णाचीं गाणीं
राधेचीं गाणीं
आवडतीं भावगीतें
शुक्लांचीं गाणीं
मुक्ताफळें

## कथा-संग्रह

भरारी
कागदी बदाम
आठवा सर्ग
असत्याचे प्रयोग
एका कारागिराची कहाणी

## कादंबरी

कमलेची कहाणी
देवाच्या दुनियेंत
जान कुर्बान
नवी राजवट
देव जागा आहे
सोनं पिकलंय् शेतांत
लढा लढूं या स्वातंत्र्याचा
दरिद्री नारायण

## संकीर्ण

सुदाम्याचे पोहे : चित्रकथा
गोराकुंभार : चित्रकथा
भक्तीचा मळा : चित्रकथा
प्रेमाच्या कानगोष्टी : प्रबन्ध
प्रेमिकाची भेट : गद्यगीतें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४०६१
REFBK-0014061
REFBK-0014061
अनुक्रम १००६२

## फळें रसाळ गोमटीं

पण त्यासाठीं बीजहीं शुद्ध हवें, ही गोष्ट ओळखून आमच्या संतांनीं काव्याच्या द्वारा लोकांचीं मनें घडविलीं. खडकाळ भूमींत भाज्यांचा आणि फळांचा भरघोस मळा फुलवितांना 'संत सांवता माळी' ह्यानें समाजाच्या रेताड मनोभूमींतही भक्तीचे निर्झर वाहावयास लावले. समाजकंटकांच्या छळाला न जुमानतां 'कर्तव्य हाच देव आणि कार्य हीच भक्ति' ह्या श्रद्धेनें त्यानें श्रीविठ्ठलाला आपल्या घरीं येण्यास भाग पाडलें.



श्री. सदाशिवराव शुक्ल ह्यांच्या गाजलेल्या 'भक्तीचा मळा' ह्या चित्रपटाची ही कथा आबाल-वृद्धांच्या मनावर सुपरिणाम करील, त्यांना काव्यविलासांत खिळवून ठेवील, त्यांचीं मनें उल्हसित करील.

कर्नाटक प्रकाशन संस्थेच्या 'चेतक' पुस्तकमालेंतून भारतीय सांस्कृतिक जीवनाला समृद्ध करणाऱ्या अशा रंजक आणि बोधक कथा प्रसिद्ध करून जीवनांतील मूल्यें स्थिर आणि दृढ करण्याचा आणि जनमनांत शुद्ध बीजें पेरण्याचा हा आमचा उपक्रम आहे.